चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १२.०५.२०२५ | अंक नं. ३५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवारी दालबाटी व चुरमा व दररोज आमरसाचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर.
पार्सल सुविधा उपलब्ध...

फक्त फायदाच फायदा !
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
कॅशियर — जागा : 2 (पु.) पगार : 17000/- ते 18000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
सेल्समन — जागा : 4 (स्त्री) पगार : 13000/- ते 15000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा; जागा : 3 (स्त्री) पार्टटाईम
मोड कारागिर — जागा : 2 (पु.) पगार : 15000/- ते 17000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा मोड विभागातील सोने-चांदी मोडीचा अनुभव.
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
विविध ठिकाणचा अनुभव असलेल्या उमेदवारांनी आपल्या सविस्तर अर्ज बायोडाटासह मंगळवार ते शनिवार सकाळी 11 ते 1 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## मान्सून अंदमानमध्ये वेळेआधीच पोहचला

दिल्ली – यंदाचा नैऋत्य मान्सून वेळेआधीच देशात दाखल होणार असल्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून दक्षिण अंदमान समुद्र आणि दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागराच्या काही भागात पोहचला आहे. तसेच तो १३ मे पर्यंत निकोबार बेटांवरही पोहोचेल, असा अंदाज आहे.

ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ के.एस. होसाळीकर यांनी यासंदर्भात माहिती दिली. त्यानुसार, पुढील चार ते पाच दिवसात मान्सून दक्षिण अरबी समुद्र, मालदीव आणि कोमोरिन क्षेत्रात प्रगती करेल. त्यामुळे यंदा मान्सून नियोजित वेळेच्या चार दिवस आधी केरळमध्ये दाखल होणार आहे. ही स्थिती २००८ नंतर प्रथमच घडत आहे.

सामान्यतः केरळमध्ये मान्सून ३१ मे रोजी पोहोचतो. मात्र यंदा २७ मे रोजीच तो दाखल होणार आहे. त्यानंतर मान्सून वेगाने प्रगती करेल. १५ मे नंतर तो दक्षिण अरबी समुद्रात शिरेल आणि श्रीलंकेच्या काही भागांसह संपूर्ण अंदमान बेटांवर प्रभावी होईल. गोव्यात ५ जूनला मान्सून पोहोचेल, तर महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर ६ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. मुंबई आणि मध्य महाराष्ट्रात १० जूनच्या सुमारास पावसाचे आगमन होईल. यापुढे उत्तर भारताकडे त्याची वाटचाल होईल.

### महाराष्ट्रात ६ जूनपर्यंत येणार?

**५ जून** : गोवा, कर्नाटक, आंध्र प्रदेश किनारपट्टी, पश्चिम बंगाल, **६ जून** : महाराष्ट्र, आंध्र प्रदेशचे अंतर्गत भाग, **१० जून** : मध्य महाराष्ट्र, मुंबई, तेलंगणा, ओडिसा, झारखंड, बिहार, **१५ जून** : गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, **२० ते ३० जून** : राजस्थान, हरियाणा, उत्तराखंड, दिल्ली.

हवामान विभागाने यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. यंदा देशात १०६ टक्के पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अल निनो वा ला निनासारखी स्थिती या वर्षी उद्भवणार नाही, असेही सांगण्यात आले आहे. गेल्या २० वर्षांत २०१५ वगळता विभागाचा पावसासंबंधीचा अंदाज बऱ्याच अंशी अचूक ठरला आहे. त्यामुळे यंदाही कृषी क्षेत्राला दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्यातील काही भागांत पुढील चार दिवसात वादळी वाऱ्यांसह अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विशेषतः जळगाव जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सोमवारी जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह वादळी वारे व पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## दहावीच्या परिक्षेचा निकाल १३ मे रोजी दुपारी १ वा. ऑनलाईन जाहीर होणार

पुणे – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल १३ मे रोजी दुपारी १ वाजता बोर्डाने निश्चित केलेल्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर होणार आहे.

मंडळाने सोमवारी पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या ९ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी – मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्याची घोषणा केली. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गुणपत्रिकांचे वाटप केले जाईल.

विद्यार्थ्यांना संकेतस्थळांवर विषयनिहाय संपादित केलेले गुण उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रतही (प्रिंट आऊट) घेता येईल. विशेषतः शाळांना https://mahahsscboard.in (in school login) या संकेतस्थळावर एकत्रित निकाल व इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होईल. मंडळाने विद्यार्थ्यांना गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी १४ ते २८ मे पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचीही मुभा उपलब्ध करून दिली आहे. पण त्यासाठी त्यांना योग्य ते शुल्क भरण्याची सूचना केली आहे.

**या संकेतस्थळावर पाहता येईल निकाल**

https://results.digilocker.gov.in, https://sscresult.mahahsscboard.in,http://sscresult.mkcl.org, https://results.targetpublications.org, https://results.navneet.com

इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर. फोन 0241-2423336
मो. 9130423336 * 9860310001
तर्फे
मोफत सर्वरोग तपासणी
• सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
Star Health, Sbi General Insurance, Oriental Health Insurance & All Tpa, National Insurance, Reliance Insurance Company, Universol Sampo, Manipal Cigna, IFFCO TOKIO, Tata Aig General Insurance, ICICI Lombard, Bajaj Allianz, HDFC ERGO, Medi Assist, Future Genrali
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध
उपलब्ध सुविधा
सर्व रोग निदान व उपचार
• जनरल सर्जरी (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया)
• कार्डियाक (कॅथलॅब, अॅन्जीओप्लास्टी)
• युरोलॉजी (डायलिसीस, किडनीस्टोन, प्रोस्टेट सर्जरी)
• मेडिसीन (डायबेटिस, हृदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर)
• ऑर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपन)
• स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहीत प्रसुती)
• बालरोग व नवजात रोगशास्त्र
• ऑन्कोलॉजी (सर्जरी व किमोथेरपी)
• पॅथॉलॉजी
• रेडिओलॉजी
• सिटीस्कॅन
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी | २४ तास आपत्कालीन व अॅम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध


सुट्ट्या लागल्या
भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?
चला तर मग मयुरी मॉलला
बाबा सुट, फ्रॉक, पार्टीवेअर ड्रेस व बरेच काही
१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
• सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
• असंख्य नवनवीन व्हरायटीज्
• होलसेल पेक्षाही कमी दरात
अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल
मयुरी लेडीज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. 9028201188

MAHA DISCOUNT offer in Any Course Just 1800/-
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch — Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

अहिल्यानगरमधील नामांकित प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये खालील जागा त्वरित भरणे आहे.
* आर.एम.ओ.BAMS/BHMS – ०५ पदे
* स्टाफ नर्स GNM/ANM – १५ पदे
* मावशी/मामा –२५ पदे (शिक्षण ७ वी पास असावे)
* महिला /पुरुष सफाई कर्मचारी–१० पदे
वरील सर्व पदासाठी अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल
संपर्क - 7715882777, 8446544259, 9370247009

स्मृतिगंध

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकूळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या
आठवणी आमच्या मनात..



स्व. नेमीचंदजी मुनोत
(नेवासकर)

।। आपल्या पावन स्मृतिस विनम्र आदरांजली ।।

केशरगुलाब मुनोत परिवार
(नेवासकर)
आडत बाजार, अ.नगर.

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 08 MAY - 15 MAY 2025
रेड २ — 10:00 AM I 12:30 PM 09:00 AM I 11:15 PM 05:15 PM I 08:00 PM 10:45 PM I 02:00 PM
गुलकंद — 06:00 PM I 08:45 PM
हिट: थर्ड केस — 03:15 PM I 07:30 PM 10:30 PM
पी.एस.आय. अर्जुन — 11:45 AM
केसरी २ — 11:30 AM
आता थांबायचं नाय — 04:45 PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Box Office | bookmyshow
नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

दिनांक – 08 मे ते 15 मे 2025
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
MAJHI PRARTHANA 07:15 PM
GULKAND 04:30 PM
RAID 2 09:15 AM 12:00 PM I 02:40 PM 05:20 PM I 08:00 PM 10:00 PM I 10:40 PM
BHOOL CHUK MAAF 08:30 AM I 10:00 AM 12:30 PM I 03:00 PM 05:30 PM I 08:00 PM 10:30 PM
ATA THAMBAYCHA NAAY 01:45 PM
PSI ARJUN 1100P M
BLOCKBUSTER
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

SONI Since 1965 TILES AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# सप्ताहाच्या सुरुवातीलाच शेअर बाजाराने घेतली उसळी; सेन्सेक्सने २,२०० तर निफ्टी ७०० अंकांनी वधारला

मुंबई - भारत आणि पाकिस्तानमध्ये सीमारेषेवर युद्धबंदीमुळे सोमवारी (१२ मे) भारतीय शेअर बाजाराने उसळी घेतली. सुरुवातीनंतर काही तासांत बीएसई सेन्सेक्सने २,२०० अंकांपेक्षा जास्त वाढ नोंदवली तर निफ्टीनेही जवळपास ७०० अंकांची झेप घेतली. या दरम्यान, खाजगी क्षेत्रातील येस बँकेच्या शेअर्समध्ये मोठी वाढ झाली. जपानी बँक SMBC आता येस बँकेतील मोठा हिस्सा खरेदी करणार आहे. यामुळे, आज बाजार उघडताच बँकेचा शेअर ८.७% वाढून २१.७४ रुपयांवर पोहोचला.

सुमितोमो मित्सुई बँकिंग कॉर्प (SMBC) ने येस बँकेतील २०% हिस्सा खरेदी करण्यासाठी १३,४८३ कोटी रुपयांचा करार अंतिम केला असून यासह येस बँकेचे मूल्य ६७,४११ कोटी रुपये इतके झाले आहे. SMBC येस बँकेचे शेअर्स २१.५ रुपये प्रति शेअर दराने खरेदी करेल, ज्यामुळे या जपानी कंपनीला बँकेवर अधिक नियंत्रण मिळू शकेल.

याअंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) येस बँकेतील त्यांच्या २४% हिस्स्यांपैकी १३.१९% हिस्सा ८,८८९ कोटी रुपयांना विकेल. याशिवाय HDFC बँक, ICICI बँक, कोटक महिंद्रा बँक, ॲनक्सिस बँक, IDFC फर्स्ट बँक, फेडरल बँक आणि बंधन बँक एकत्रित त्यांचे ६.८१% हिस्सेदारी ४,५९४ कोटी रुपयांना विकतील. SBI आणि येस बँकेच्या संचालक मंडळांनी शुक्रवारी या कराराला मान्यता दिली असून शुक्रवारी याआधी गेल्या आठवड्यात बीएसईवर येस बँकेचे शेअर्स जवळपास १०% वाढले आणि २० रुपयांवर बंद झाले.

SBI सह इतर अनेक बँका येस बँकेतील शेअर्स विकत आहेत, ही बातमी गेल्या आठवड्यात आली, ज्याचा परिणाम शेअर बाजारातही दिसून येत आहे. सोमवारी कंपनीचे शेअर्स ८% वधारले असून BSE वर येस बँकेचे शेअर्स २१.५६ रुपयांच्या वाढीसह उघडले. त्यानंतर बाजार सुरू झाल्याच्या काही वेळातच कंपनीच्या शेअरची किंमत ८% वाढून २१.७४ रुपयांच्या पातळीवर पोहोचली.

स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर सात बँकांनी शुक्रवारी येस बँकेतील एकत्रित हिस्सेदारीपैकी २०% जपानच्या SMBC ला १३,४८३ कोटी रुपयांना विकण्याची घोषणा केली. यासह, ही भारतीय बँकिंग क्षेत्रातील सर्वात मोठी परदेशी गुंतवणूक ठरेल. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर SMBC मुंबईस्थित येस बँकेचा सर्वात मोठा भागधारक बनेल.

SMBC अधिकाऱ्यांनी सांगितले की भारत त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. जपानी बँकेच्या जागतिक विस्तार योजनांचे मुख्य कारण भारताची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१



### वाचनीय जुनं सोनं... अवश्य मिळवा - वाचा..

१९ व २० व्या शतकामध्ये अनेक लेखकांच्या दर्जेदार व अनुभवसंपन्न लेखणीतून अजरामर असे साहित्य निर्माण झाले (होते) आहे. शाळा, कॉलेजमध्ये या साहित्याची वाच्यता वा माहितीही मिळत नसल्याने होते म्हणावे लागतंय.

त्याकाळी जनमानसावर अधिराज्य गाजवणारे ते साहित्यरूपी ग्रंथ, पुस्तके आज मात्र बाजारात उपलब्ध नाहीत. क्वचितच एखाद्या जुन्या ग्रंथालयामधून जीर्णशीर्ण झालेल्या, अर्धीनिम्मी पानं गळालेल्या अवस्थेत ही पुस्तके पाहायला मिळतात. डिजीटलायझेशन, इ-लायब्ररी इ. पर्याय अजूनही मोठ्या प्रमाणात नाहीत. शिवाय वरिष्ठ नागरिकांना ते जमतही नाही. बऱ्याचदा अन् डोळ्यासमोर पानं वाचण्याचा फीलही येत नाही.

अशा अनमोल साहित्याची ओढ रसिक वाचकांना आहे. त्यासाठी आपल्या शहरात राज्यातील सर्वप्रथम व शतकाहूनही जुने असे अ.नगर जिल्हा वाचनालयात सुमारे लाखभर पुस्तके, ग्रंथ आहेत. त्याचा जरुर फायदा घ्या किंवा माहितीतल्या ग्रंथालयात जावं.

निदान आदर्शवत ठरलेले लोकमान्य टिळक (गीतारहस्य), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना, अर्थ, राजकारण, धर्म, सामाजिक सुधारणा याविषयी विविध पुस्तके, स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मठेप, रविंद्र पिंगे, रा. ग. गडकरी, वि. स. खांडेकर, आचार्य प्र. के. अत्रे, खानविलकर, श्री. कृ. कोल्हटकर, पु. ल. देशपांडे, सुहास शिरवळकर, बाबूराव अर्नाळकर, बाबा कदम, व. पु. काळे या प्रसिद्ध लेखकांसह कविता लिहिणारे कुसुमाग्रज, शांता शेळके यात अनेक मान्यवरांची मांदियाळी आहे. समुद्रात किती पाणी हे आपण समजू शकू का? निदान एखाद्या थेंबाची तरी अनुभूती घेता येईल ना?

# विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा



मुंबई - भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा पाठोपाठ अँग्री यंग मॅन म्हणून ओळख असणारा भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि खेळाडू विराट कोहलीने देखील कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. याबाबतची घोषणा विराटने इन्टाग्रामवर एक पोस्ट करत केली आहे.

विराटने त्याच्या पोस्टमध्ये लिहिले की, 'मी १४ वर्षांपूर्वी कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच बॅगी ब्लू जर्सी घातली होती. खरं सांगायचं तर, हा फॉरमॅट मला अशा प्रवासात घेऊन जाईल अशी मी कधीच कल्पना केली नव्हती. त्याने माझी परीक्षा घेतली, मला परिभाषित केले आणि मला असे धडे शिकवले जे मी आयुष्यभर माझ्यासोबत घेऊन जाईन. पांढऱ्या जर्सीमध्ये खेळणे हा माझ्यासाठी खूप खास आणि वैयक्तिक अनुभव आहे. कठोर परिश्रम, लांब दिवस, छोटे क्षण जे कोणीही पाहत नाही, पण ते कायमचे तुमच्यासोबत राहतात. मी या फॉरमॅटपासून दूर जात असताना, ते सोपे नाही, पण सध्या ते योग्य वाटते. मी माझे सर्वस्व दिले आहे आणि त्याने मला अपेक्षेपेक्षा जास्त दिले आहे. मी खेळाबद्दल, मैदानावरील लोकांबद्दल आणि या प्रवासात मला साथ देणाऱ्या प्रत्येकाबद्दल आभारी आहे. मी माझ्या कसोटी कारकिर्दीकडे नेहमी हसतमुखाने पाहेन. त्याने पुढे त्याचा जर्सी नंबर लिहिला आणि 'साइनिंग ऑफ' असे म्हटले आहे.

### विराट कोहलीची कसोटी कारकीर्द

विराट कोहलीने जून २०११ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने वेस्ट इंडिजच्या संघाविरुद्ध पहिला सामना खेळला होता. विराट कोहलीने आपल्या कसोटी कारकीर्दीत एकूण १२३ कसोटी सामने खेळले आहेत. त्यामध्ये २१० डावांमध्ये विराट कोहलीने ४६.८५ च्या सरासरीने ९२३० धावा केल्या आहेत. यामध्ये ३० शतकं आणि ३१ अर्धशतकांचा समावेश आहे. विराट कोहली भारतीय क्रिकेट संघाचा एक यशस्वी कर्णधार होता आणि त्याने अनेक विक्रम आपल्या नावावर नोंदवले आहेत.

# केडगाव जवळ गोमांसची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

## १२०० किलो गोमांस जप्त, मुंबईच्या एकास पोलिसांनी केली अटक

नगर - गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास बंदी असताना गोवंशीय जनावरांचे कत्तल केलेले मांस वाहतूक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी केडगाव येथील आरती हॉटेल समोर ११ मे रोजी रात्री साडेनऊ वाजता पकडला. या कारवाईत १ हजार २०० किलो गोमांस जप्त करुन एकास ताब्यात घेतले.

याबाबतची माहिती अशी की कोतवाली पोलिसांना गोरक्षकांकडून माहिती मिळाली की, टाटा इंट्रा गाडी ही गोमांस घेऊन केडगावच्या दिशेने पुण्याला जाणार आहे, अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलीस केडगाव येथील आरती हॉटेल येथे थांबले असता मिळालेल्या माहितीप्रमाणे टाटा इंट्रा गाडी (क्र. एम एच ०४ एल वाय १५६२) त्यांना येताना दिसली, पोलिसांनी गाडीवरील चालकास गाडी थांबवून त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता जहीर इस्माईल कुरेशी (वय ४२, रा. साकी नाका रस्ता, मुंबई ) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी टेम्पोची पाहणी करुन आतील गोमांस कुठे घेऊन जात आहे अशी विचारणा केली असता त्याने हे मी पुण्याला घेऊन जात आहे असे उत्तर दिले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याच्या कडील ३ लाख रुपये किमतीचा टाटा इंट्रा टेम्पो, २ लाख ४० हजार रुपये किमतीचे १हजार २०० किलो गोमांस असा ५ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ. सचिन लोळगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जहीर कुरेशी याचे विरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २७२, ३२५ सह महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९९५ चे सुधारीत २०२५ चे कलम ५, ५ (क ), ९, ९ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील ५६ केसेस लोक अदालत मध्ये निकाली

नगर - भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये दाखल असलेल्या ५६ केसेस लोकअदालत मध्ये निकाली काढण्यात आल्या. अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक मुलगीर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

१० मे रोजी जिल्हा न्यायालय येथे लोक अदालतचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीमध्ये भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीत भा. न्या. सं. कलम २८५ प्रमाणे दाखल केसेस पैकी १८ केसेस, महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३३ (१) डब्ल्यू प्रमाणे १० केसेस, मोटार वाहन कायदा १८५ प्रमाणे १६ केसेस, महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे १२ केसेस अशा एकुण ५६ केसेस मधील गुन्हेगारांना न्यायालयात हजर ठेवुन त्यांचे विरुद्ध असलेल्या विविध कलमान्वये दाखल केसेस मध्ये न्यायालयात ४९ हजार ५०० रुपये असा दंड भरुन घेऊन केसेस निकाली काढण्याची कामगिरी भिंगार कॅम्प पोलिसांनी केली आहे.

ही कामगीरी सहायक पोलीस निरिक्षक जगदीश मुलगीरयांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक गजेंद्र इंगळे पोलीस अंमलदार संजय पठारे, दिपक शिंदे, रविंद्र टकले, सतिश थोरात, रमेश कुलांगे, बबन बेरड, बापु उंडे, कावेरी वखरे यांनी केली आहे.

## राधाबाई तनपुरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - भिंगार येथील ब्राह्मणगल्लीमधील रहिवासी राधाबाई बाळासाहेब तनपुरे (वय ८०) यांचे ११ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ३ मुल, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुदाम मोरे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - नालेगाव येथील रहिवासी असलेले सुदाम बन्सी मोरे (वय ७०) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांना धार्मिक कार्याची आवड असल्या कारणाने त्यांनी बरीच वर्ष अमरधाम येथील मंदिरात सेवा केली.

## इंदुबाई शहाणे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील इंदुबाई लक्ष्मण शहाणे (वय ८०) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, दिर, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या कैलास शहाणे यांच्या मातोश्री, गोविंद रघुनाथ शहाणे यांच्या भावजई, राजेंद्र, नागेश व बाळासाहेब शहाणे यांच्या चुलती, सुमित, संकेत, दिपक व गणेश शहाणे यांच्या आजी होत.

## रविंद्र डेंगळे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील रविंद्र माधवराव डेंगळे (वय ७९) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन मुले, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नेवासारोड येथील न्यू हायटेक गॅरेजचे मालक विकास डेंगळे व किरण डेंगळे यांचे वडील,

निमगांवजाळी व शिरसगांव येथील शेतकरी अरुण डेंगळे व शशिकांत डेंगळे यांचे बंधू होत.

## मदन घुंडरे पाटील यांचे निधन

आळंदी - येथील युवा उद्योजक शिवसेना आळंदी उपशहर प्रमुख मदन विठ्ठल घुंडरे पाटील (वय ३९) यांचे ८ मे रोजी निधन झाले. त्यांचे मागे पत्नी, मुलगा, तीन भाऊ आई, वडील, असापरिवार आहे. आळंदीतील सामाजिक, अध्यात्मिक, राजकीय क्षेत्रातील कार्यात नेहमी सहभाग होता. कापड उद्योजक मुरलीधर घुंडरे, ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवारातील घटक प्रा. श्रीधर घुंडरे पाटील यांचे ते लहान बंधू होत. शोकाकुल वातावरणात आळंदीत त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले.

# नगर शहरासह जिल्ह्यात सर्वदूर अवकाळी पावसाची हजेरी

## शेवगाव, संगमनेर, अकोले, कोपरगाव मध्ये सलग दुसऱ्या दिवशी पाऊस

नगर - नगर शहरासह जिल्ह्यात ११ मे च्या रात्रीपासून १२ मे च्या सकाळ पर्यंत सर्वदूर अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यामध्ये शहरासह तालुक्यात सरासरी ५.५ मिमी पावसाची नोंद झाली. तर शेवगाव, संगमनेर, अकोले, कोपरगाव तालुक्यांच्या काही मंडळांत सलग दुसऱ्या दिवशी अवकाळी पाऊस झाला आहे.

नगर जिल्ह्यासह राज्याच्या काही भागात ११ ते १६ मे पर्यंत गारपीट तसेच वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला होता. तो तंतोतंत खरा ठरल्याचे दिसत आहे. शहरात व तालुक्यात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास या अवकाळी पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे अनेक भागातील वीज पुरवठा खंडित झाला होता. परिणामी प्रचंड उकाड्याने नागरिकांचे चांगलेच हाल झाले. पहाटे पर्यंत अधून मधून हा पाऊस सुरु होता.

नगरच्या नालेगाव मंडलात ९.८ मिमी पाऊस नोंदवला गेला आहे. याशिवाय सावेडी ३ मिमी, कापूरवाडी ७.५ मिमी, केडगाव ३.८ मिमी, भिंगार १.८ मिमी, नागापूर ०.३ मिमी, जेऊर २.५ मिमी, चिचोंडी पाटील ५ मिमी, वाळकी १० मिमी, चास ८.५ मिमी, रुईछत्तीशी ८.५ मिमी, चास ५.५ मिमी असा सरासरी ५.५ मिमी पाऊस झाला आहे.

पारनेर तालुक्यात ९ पैकी ८ मंडलात सरासरी १०.९ मिमी, श्रीगोंदा तालुक्यात १२.८ मिमी, कर्जत तालुक्यात ३.४ मिमी, जामखेड तालुक्यात १ मिमी, शेवगाव १ मिमी, पाथर्डी २.८ मिमी, नेवासा ६.६ मिमी, राहुरी १.७ मिमी, संगमनेर ७.१ मिमी, अकोले ०.६ मिमी, कोपरगाव ०.६ मिमी अशी जिल्ह्यात सरासरी ४.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्याच्या काही भागात १४ मेपर्यंत पावसाचा अंदाज

जिल्ह्याच्या काही भागात १४ मे पर्यंत वीजांच्या कडकडाटांसह वादळी वारा व हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१- २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## टँकरची दुचाकीला धडक; युवतीचा मृत्यू

नगर - टँकरने दुचाकीला दिलेल्या धडकेत युवतीचा मृत्यू झाला असून तिचे वडिल जखमी झाले आहेत. अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर सैन्य दलाच्या सीक्यूएव्ही गेटसमोर ११ मे रोजी सकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान हा अपघात झाला.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. जानवी विश्वनाथ शेळके (वय २०, रा. गुलमोहर रस्ता, सावेडी, अहिल्यानगर) असे मयत युवतीचे नाव असून तिचे वडिल विश्वनाथ शेळके जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. विश्वनाथ शेळके व मुलगी जानवी हे अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून दुचाकीने प्रवास करत असताना त्यांच्या दुचाकीला टँकरने धडक दिली.

या धडकेत जानवीचा मृत्यू झाला तर विश्वनाथ जखमी झाले. घटनेची माहिती तोफखाना पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. टँकर ताब्यात घेतला. सदरचा टँकर अमोल बबन बोखारे (रा. समर्थनगर, केडगाव रस्ता, अहिल्यानगर) हा चालवित असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल गायधनी करीत आहेत.

## तरुणाची गळफास घेत आत्महत्या



नगर - तरूणाने शेतात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मनोज जगन्नाथ करंडे (वय २८, रा. सांडवे, ता. नगर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे.

१० मे रोजी सकाळी मनोज करंडे यांनी शेतात गळफास घेतल्याचे समोर आल्यानंतर त्यांना नातेवाईकांनी ६:४० वाजेच्या सुमारास गंभीर अवस्थेत येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे यांनी पोलिसांना दिली. त्यावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस अंमलदार रमेश गांगर्डे अधिक तपास करीत आहेत. मयत मनोज याच्या पश्चात आई, वडील, १ बहिण, आजोबा असा परिवार आहे.

# सर्जेपुरा येथील रंगभवन व्यापारी संकुलात ३ मजले फक्त पार्किंगसाठी राखीव ठेवणार

## ४८ व्यावसायिक गाळे, सांस्कृतिक सभागृहाचा समावेश : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे



नगर - सर्जेपुरा येथील महानगरपालिकेचे रंगभवन व्यापारी संकुल पाडून त्याजागी व्यापारी संकुल, सांस्कृतिक सभागृह व पार्किंग व्यवस्था असलेले बहुमजली संकुल उभारण्यात येणार आहे. मध्य शहर व बाजारपेठेतील पार्किंग समस्या मार्गी लावण्यासाठी या संकुलात व्यवस्था करण्यात आली आहे. संकुलातील तीन मजल्यावर ४१० दुचाकी व १०० चारचाकी वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे मध्य शहरातील व बाजारपेठेतील पार्किंगची समस्या दूर होण्यास मदत होणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

सध्याच्या रंगभवन व्यापारी संकुलात तळ मजल्यावर १८ गाळे आहेत. आता आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून महानगरपालिकेने स्वतःच हे व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा आराखडाही तयार करण्यात आला आहे. संकुलात ४८ व्यावसायिक गाळे, सांस्कृतिक सभागृह व पार्किंग असणार आहे. शहरातील बाजारपेठेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर व बाजारपेठेजवळच हे संकुल असल्याने बाजारपेठेतील पार्किंगचा प्रश्न या संकुलामुळे मार्गी लागणार आहे.

प्रस्तावित नवीन रंगभवन व्यापारी संकुलात तळघर - पार्किंग, तळमजला - पार्किंग व २४ गाळे, पहिला मजला - पार्किंग व २६ गाळे, दुसरा मजला - पार्किंग, तिसरा मजला - पार्किंग, चौथा मजला - सांस्कृतिक सभागृह अशी व्यवस्था असणार आहे. नव्याने संकुल उभारणीसाठी तयार करण्यात आलेला आराखडा नगररचना विभागाकडे तपासणीसाठी पाठवून त्याचा आराखडा मंजूर करून घेतला आहे. अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. संकुलाच्या उभारणीसाठी सुमारे ३५ कोटींचा खर्च अपेक्षित असून, राज्य व केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज योजनेतून निधी मिळवण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

बाजारपेठ व मध्य शहरात दिवसेंदिवस पार्किंगची समस्या वाढत आहे. त्यामुळे व्यापारी संकुलांमध्ये पार्किंगसाठी अधिकाधिक जागा पार्किंगसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. सर्जेपुरातील रंगभवन व्यापारी संकुलात तीन मजले केवळ पार्किंगसाठी राखून ठेवण्यात आले आहेत. बहुमजली पार्किंग असणारे शहरातील व महानगरपालिकेचे हे पहिलेच व्यापारी संकुल उभारण्यात येणार आहे. यामुळे मध्य शहरातील बाजारपेठेतील पार्किंगची समस्या सुटण्यास मदत होईल, असा विश्वास यशवंत डांगे यांनी व्यक्त केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### या लोकांनी खाऊ नये पेरू

पेरूमध्ये फायबर जास्त असतो. ज्यांना अपचन, गॅस, ॲसिडिटी असे त्रास असतील त्यांनी ते खाणे टाळावे. पेरूमध्ये नैसर्गिक साखर असते. मधुमेहाच्या रुग्णांनी डॉक्टरांचा सल्ला घेऊनच पेरू खावा. काही लोकांना पेरूपासून ॲलर्जी होऊ शकते उदा. पुरळ, खाज, श्वासाचा त्रास. पेरूच्या बियांमुळे बद्धकोष्ठतेचा त्रास वाढू शकतो.

अशा लोकांनी बिया न खाणेच योग्य. रात्री पेरू खाल्ल्याने घसा खवखवणे, वेदना, सर्दी होऊ शकते. शंका असल्यास आणि आरोग्यविषयी अनिश्चितता असल्यास कोणताही आहार बदल करताना डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## पाककला

### कटाची आमटी

**साहित्य :** १ कप चणा डाळ (कट), २ टेबलस्पून तडका मसाला, १ टेबलस्पून लाल तिखट, १ टीस्पून गरम मसाला, चवीनुसार मीठ, १ टीस्पून धणे पावडर, १ टीस्पून जीरे, ४ ते ५ टेबलस्पून तेल, १/२ टीस्पून हळद, ८ ते १० कढीपत्ता पाने, बारिक चिरलेली कोथिंबीर,

**कृती :** हरभरा डाळीचे पाणी त्यात थोडी हरभरा डाळ शिजवलेली घाला. नंतर त्यात गरम मसाला, तिखट, धणे पूड, घाला व एकजीव करून घ्यावे. तडका मसाला, कांदा, लसुण, आले, खोबर किस, खडे मसाले, हिरवी मिरची, कोथिंबीर, सगळे तेलावर खमंग भाजून घ्या. गार झाल्यावर मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. आता जाड बुडाच्या पातेल्यात तेल तापत ठेवा. त्यात जीरे घाला, हळद घाला, कढीपत्ता पाने, तडका मसाला घालून तो चांगला परतून घ्या. नंतर त्यात हरभरा डाळीच्या पाण्याचे मिश्रण घाला. चवीनुसार मीठ घालून मिक्स करावे. गरजेनुसार पाणी घालून घ्या. त्यात कोथिंबीर घाला. उकळी आल्यावर गॅस बंद करावा.

## वास्तू

### सकारात्मक ऊर्जेसाठी

* आठवड्यातून एकदा तुमच्या घरातले निरुपयोगी सामान घराबाहेर काढा. बंद पडलेली घड्याळं, अन्य वस्तू एकतर दुरुस्त करा किंवा घराबाहेर काढा. जेवढा पसारा कमी कराल तेवढं घर अधिक प्रशस्त, छान वाटेल. कारण घरात जर खूप पसारा असेल, घर आवरलेले, स्वच्छ, टापटीप नसेल तर आपोआपच घरात खूप अस्वस्थ होते. पसारा पाहून चिडचिड होते, वैताग येतो. तेच जर तुम्ही स्वच्छ आवरलेल्या घरात बसला तर तुम्हाला छान प्रसन्न वाटते.

* दुसरा उपाय म्हणजे घरात कायम सुगंध दरवळत असावा. यासाठी तुम्ही धूप, उदबत्ती, कापूर अशा गोष्टींचा वापर करू शकता किंवा रूम फ्रेशनर वापरू शकता.

## सल्ला

आठवड्यातून एकदा फरशी पुसण्याच्या पाण्यात रॉक सॉल्ट घालून त्याने फरशी पुसा. यामागचे विज्ञान असे की मीठ हे किटकनाशक आहे. मिठामुळे अनेक जंतू दूर होतात.

## सौंदर्य

स्किन सायकलिंगमुळे तुमच्या त्वचेला सक्रिय घटकांचा फायदा होतो. एक दिवस एक्सफोलिएट करा, दुसऱ्या दिवशी रेटिनॉल लावा आणि नंतर दोन दिवस मॉइश्चरायझर लावा. यामुळे त्वचेला आराम मिळतो आणि जळजळ होण्याचा धोका देखील कमी होतो. अशा प्रकारे तुमची त्वचा चमकदार होते आणि निरोगी राहते. कोरड्या किंवा निर्जलीकरण झालेल्या त्वचेसाठी हे चांगले आहे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १३ मे २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, विशाखा ०९।०९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : काही विशेष करण्याचा प्रयत्न कराल. मनोरंजनासाठी काही प्लॅन कराल. जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळाल.

**वृषभ** : पळापळ देखील अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. धनाचा व्यय होईल. मागील बाकी व उधारी वसुल होईल. आर्थिक विषयांमध्ये स्थिती सहयोगात्मक राहील.

**मिथुन** : कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्याल. जुन्या मित्रांची भेट होईल.

**कर्क** : सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल. लाभ होईल.

**सिंह** : आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील. उधारी उसनवारी मिळेल. व्यापार उत्तम चालेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल.

**कन्या** : आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल. मागील उधारी उसनवारी मिळेल. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल एवं दिवस उत्तम जाईल.

**तूळ** : जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल. वाहने व उपकरणे बिघडतील.

**वृश्चिक** : चांगले प्रदर्शन करण्यास अडचणी येतील. निवेश प्रत्याशित. मांगलिक, धार्मिक कामात अडथळा.

**धनु** : कौटुंबिक जीवन उत्तम असेल आणि घरातील मंडळी फारच आनंदात राहणार आहे. मागील येणी वसुल होईल.


**मकर** : भावनांच्या भरात वाहून नुकसान होण्याची शक्यता आहे. नोकरी विषयक मुलाखती यशस्वी होतील. विवाहेच्छूकांचे विवाह जमतील.

**कुंभ** : सहकाऱ्यांशी होणारे वैचारिक मतभेद टळतील. नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. मागील उधारी वसुल होईल.

**मीन** : ग्रहदशेत एक महत्त्वपूर्ण बदल झाल्याने स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१७५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) राम-लक्ष्मणाचे वडील ४) कर्माचा मनावर राहणारा संस्कार ७) मग्न; रममाण; लीन ८) वेळ वाया घालविणे ९) नूतन; नवीन १०) कुंपणाचा मोठा दरवाजा १३) आकाश; अंबर; गगन १५) ऐसपैस घातलेली मांडी १८) धोबी; परीट २१) बडबड; कोमलता; चुरुचुरू २२) कलम; गोष्ट २३) तशा प्रकारचा; तसला २४) एक खनिज द्रव्य

**उभे शब्द :-** १) जोराने फुटून बाहेर आलेला २) शंभर; शे ३) थकवा; ग्लानी; मरगळ ४) परत; माघारी ५) डावा किंवा उजवा; दक्षिणेकडचा; उफराटा ६) नाटक किंवा चित्रपटातील मुख्य भूमिका करणारा नट ९) लाभ; फायदा ११) शरीरातील तीन दोषांपैकी एक; खोकला १२) किरकोळ नसलेले; घाऊक १४) विश्वास; खात्री १६) अंदाज; अनुमान; अदमास १७) मोठे खटले किंवा कुटुंब १९) नीर; जीवन; पाणी २०) कवीची रचना; कविता; काव्य २१) वाईट सवय; खोड २२) बगीचा; उपवन, उद्यान

### शब्दगंध क्र. ७१७४ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अभ्यासात दिवे लावले की आयुष्यात अंधार पडत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### ध्यान केल्याने शरीरामध्ये नेमके काय घडते?

लहानपणापासून आपण कधीतरी ध्यानधारणा केलीच असेल ध्यान केल्याने अनेक लाभ होतात हेही ऐकले असेल होय, खरेच आहे. ध्यानामुळे मन शांत होते, ज्यामुळे चिंता आणि अस्वस्थता कमी होते. ध्यान केल्याने शरीरातील स्ट्रेस हार्मोन कोर्टिसोलचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे ताण कमी होतो. मेंदूच्या स्कॅनमधून असे दिसून आले आहे की नियमित ध्यान केल्याने राखाडी पदार्थाची घनता (दौन नसामधील कनेक्शन) वाढते, विशेषतः शिक्षण, स्मृती आणि भावनिक नियंत्रणाशी संबंधित क्षेत्रांमध्ये याचे फायदे होतात.

तसेच प्रीफ्रंटल कॉर्टेक्स हा मेंदूचा हा भाग निर्णय घेण्यास आणि आत्मनियंत्रणासाठी जबाबदार आहे. ध्यानामुळे ते बळकट होते, ज्यामुळे चांगले लक्ष केंद्रित होते आणि आत्म-नियंत्रण होते. ध्यानामुळे डिफॉल्ट मोड नेटवर्क हे नको असलेल्या विचारांचे केंद्र देखील शांत होते. त्यामुळे एकाग्रता वाढते. ध्यान केल्याने सेरोटोनिन आणि डोपामाइन सारख्या आनंदाच्या संप्रेरकांची पातळी वाढते. ज्यामुळे मूड सुधारतो जाणि नैराश्य कमी होते.

ध्यान केल्याने कार्यरत समरणशक्ती आणि दीर्घकालीन स्मरणशक्ती सुधारते. मन शांत केल्याने निद्रानाशाची समस्या दूर होते आणि झोप अधिक खोल आणि आरामदायी होते. नियमीत ध्यान करणारे लोक समस्या सोडवण्यात आणि नवीन कल्पना निर्माण करण्यात प्रविण असतात.

ध्यान केल्याने व्यक्ती भावनिकदृष्ट्या बुद्धिमान बनते, त्याची सहानुभूती आणि भावनिक समज देखील वाढते. याशिवाय ध्यानाचे असंख्य लाभ आहेत.

### बढाई

एका घोड्याची गाडी भरधाव चालली होती, तिच्या चाकावर बसून एक माशी आपल्याशीच म्हणते, 'किती धूळ उडवते आहे ही!'.

काही वेळाने ती माशी घोड्याच्या पाठीस एक जखम झाली होती त्यावर बसून पुन्हा आपल्याशीच म्हणते, 'घोड्यास पळावयास लावणारे माझ्यासारखे दुसरे कोण आहे?

तात्पर्य : दुसऱ्याने केलेल्या कामाचे श्रेय आपल्याकडे घेऊन, त्याबद्दल बढाई मारीत बसण्याची पुष्कळ मूर्ख लोकांस सवय असते.

## रहमते दर्शन (भाग - १)



तूने यह कैसे कह दिया कि तू अछूत है।

तू मेरे दिल से पूछ, मैं तुझे कितना प्यार करता हूँ। तू फिर कभी भी अपने आपको छोटी जाति की मत समझना । मैं इस लेन-देन के झंझट से तुझे मुक्त करता हूँ। तू अपने मन से सारे डर निकाल दे ।

इतने महान थे मेरे सतुरु परम संत दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज ।

### मेरे भाई की रक्षा

पूर्ण पुरुष सदैव अपने शिष्य के अंग-संग रहते हैं। ठीक उसी प्रकार जैसे एक माँ का ध्यान हमेशा अपने बच्चे में रहता है। इसका एक उदाहरण मैं आपके समक्ष पेश करना चाहता हूँ। मुझे परम संत दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज से नामदान की दौलत प्राप्त हुई । मुझ में न कोई रूहानी गुण है, न श्रद्धा भक्ति और न ही उतना अधि एक प्यार जो एक शिष्य का अपने गुरु में होना चाहिये। इसके बावजूद महाराज जी ने मेरी एवं मेरे परिवार की भरपूर रक्षा की।

### उन्होंने अपनी रहमत से मुझे बुलाया

एक शाम को मेरा भाई प्रमोद सिंह, जिसकी आयु लगभग १० वर्ष की थी, बाजार से सामान ख़रीद कर लौट रहा था। रास्ते में बिजली भी नहीं थी। एक बदमाश ने मार-पीट कर मेरे भाई से सामान छीन लिया और उसे भी अपने साथ ले चला। बच्चे को उसने डराया, धमकाया और कहा कि यदि शोर मचाया तो तुझे जान से मार डालूँगा। बच्चा डर कर उसके साथ हो लिया। भीड़-भाड़ से दूर एक सुनसान जगह पर ले गया। बच्चा होने के कारण मेरा भाई और डर गया। वह बार-बार पीछे मुड़ कर देखता जाता था कि शायद कोई उसकी मदद के लिए आ जाये । कोई सहारा न देखकर बच्चे ने महाराज जी का स्मरण किया। थोड़ी देर में क्या देखता है कि कोई सरदार जी साइकिल पर सवार हो कर बड़ी तेज़ी से उसकी ओर आ रहे हैं। क़रीब आकर सरदार जी ने उस बच्चे की दयनीय दशा

देखकर बदमाश को ललकारा। बदमाश ने सरदार जी से कहा, तुझे क्या लेना-देना है? इस पर सरदार जी साइकिल से उतर पड़े। वह बदमाश डर गया और बच्चे को छोड़ दिया और फिर सामान भी एक तरफ फैंक कर वहाँ से भाग गया।

सरदार जी ने बच्चे को साइकिल पर बिठाया । उसका थैला भी अपनी साइकिल पर रख लिया। बच्चे से घर का रास्ता पूछे बग़ैर ही वे हमारे घर की ओर आने लगे। घर के समीप ही बच्चे को छोड़कर कहा, अब तो तुम चले जाओगे? जब बच्चे ने 'हाँ' में उत्तर दिया तो वे सरदार जी पता नहीं किधर को चले गये। यह काम केवल पूर्ण गुरु ही कर सकता है। उसने सारे जहान का ग़म अपने अन्दर समेट के रखा है।

एक दर्शन ही मिला औरों का ग़मख्वार हमें । अपने
ग़म में तो ज़माने को परेशां देखा ।।

- मताए-नूर (उर्दू ग़ज़ल-३८)

इसलिये हमसे खुशनसीब इस दुनिया में और कोई नहीं हैं जिन्हें

एक पूर्ण पुरुष की दयाधारा में जीने का अवसर मिला है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

निराकारी, निर्विकारी तथा निरअहंकारी स्थिति में सहज ही पहुंच जाते हैं।

### अनाहत चक्र

यह दयालु ऊर्जा चक्र है। इस चक्र का सूक्ष्म सम्बन्ध दया भावना से है। इस चक्र पर बिंदू प्रकाश को देखते हुये जितना हम दया भावना अर्थात मैं दयालु हूं के संकल्पों पर ध्यान देते हैं तो यह चक्र जागृत होता जाता है। कुछ व्यक्ति ऐसे मिलेंगे जो दुर्गुणों के भंडार होते कल्याण हैं। उनको कितना ही समझा लो वह नहीं मानते। ऐसे व्यक्तियों को बदलने के लिये उन के प्रति दया का भाव रखो। अपने मन में सोचते रहो मैं दयालु हूं और उनके प्रति सोचों आप का कल्याण हो। यह विचार रखने से आप को कोई कष्ट नहीं होगा उनके दुर्गुणों का आप पर असर नहीं होगा। वह बदलने लगेंगें। जब हम दया या कल्याण के संकल्प मन में रिपीट करते हैं बहुत तीखी होती हैं ऐसे समझो जैसे वेल्डिंग की तरंगे होती हैं। जैसे उन से निकली तरंगे वेलडिंग तरंगे लोहे और स्टील को काट देती हैं वा पिघला देती हैं। ऐसे ही दया की तरंगे बहुत कठोर दिल व्यक्ति का दिल बदल देती हैं। हिंसा, द्वेष, वैर, विरोध की लपटें दया का स्पर्श पा कर शांत हो जाती हैं। दया की भावना रखने से हिंसक अहिंसक, दुश्मन भी मित्र बन जाते हैं। दया के विचार रखने से स्थायी और अलौकिक विजय मिलती है। दया की भावना जीव जन्तुओं को भी जीत लेती है। उनकी हिंसक वृत्ति खत्म हो जाती है। दया के विचारों से स्नेह, आत्मीयता आदि कोमल भावों का विकास होता है। दया की भावना किसी को सुधारने का एक शक्तिशाली साधन है। अपराधी भी सुधर जाते हैं। अपराधी लोगों का जीवन किसी के सहयोग, प्रेम, सहानुभुति और आत्मीयता से रहित होता है। इसलिये ये लोग कठोर वा कुकर्मी बन जाते हैं।

दया भावना से संतोष, प्रसन्नता, उत्साह, आशा एवम उमंग पैदा होता है। दया के बिना इस संसार का संचालन सम्भव नहीं है। दया का भाव किसी वरदान से कम नहीं है। मदर तेरेसा, महात्मा गांधी, मार्टिन लूथर, विनोबा भावे ने दया भावना के कारण इस विश्व में अपना नाम रोशन किया। जो लोग अनाथालय, वृद्ध आश्रमों, महिला उत्थान ग्रहों, कुष्ट निवारण ग्रहों में रहते हैं उनके प्रति घर बैठे सोचते रहें आप का कल्याण हो तो ये तरंगे उन तक पहुंचेगी और वह ठीक होते जायेगें।

ऐसे ही कुछ व्यक्ति आप के आसपास होगें या घर में होगें जिनके संस्कार बहुत कड़े हैं, कुछ बहुत बुरी आदते हैं। वह दबंग हो सकते हैं, हिंसक वृत्ति वाले हो सकते हैं, वह अहंकारी, शकी दिमाग के हो सकते हैं, उन्हें कोई कड़ा रोग हो सकता है, वह नशेड़ी हो सकते हैं और आप के लिये नासूर बने हुये हैं। ऐसे लोगों प्रति प्यार नहीं उपजता। उनके लिये सदा सोचते रहो आप का कल्याण हो कल्याण हो। अपने प्रति सोचते रहो मैं दयालु हूं बाबा आप दया के सागर हैं। ऐसे संकल्पों से वह लोग भी बदलेंगे और हमारे भी गहरे बुरे संस्कार बदलेंगें। दयालुता के संकल्पों से हृदय चक्र जागृत होता जायेगा और आप को पता ही नहीं लगेगा और एक दिन विश्व में कल्याणकारी रुप में प्रकट हो जायेगें ।

अनाहत चक्र हमें सारे सांसर से, व्यक्तियों से, जीव जन्तुओं से, पांचो तत्वों से जोड़ कर रखता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरूजी : बंड्या, याचा अर्थ सांग मोदीजी, जीवेत् शरदः शतम्

बंड्या : शंभर शरद आले तरी मोदीजी जिवंत राहतील!

संपूर्ण वर्गाने आपल्या बंड्याला डोक्यावर घेतले

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* म. गांधींचे राजकीय गुरू कोण होते?

- गोपालकृष्ण गोखले

- **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

एकदा बाळ सहा वर्षांचे झाल्यानंतर जर आपण संस्कार करण्याचे ठरविले, तर त्याचा फारसा उपयोग होत नाही. या वयातील मुलांना शाळेत घालावे शाळेतील वातावरणामध्ये त्यांचा मानसिक व बौद्धिक विकास योग्य प्रकारे होऊ शकतो. या वयातील मुलांना शाळेमध्ये अभ्यासाचे कोणत्याही प्रकारचे दडपण नसावे. फक्त त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी हसत-खेळत एखादी गोष्ट समजावावी. या काळात त्यांना वाचनाची आवड लागण्यासाठी वेगवेगळी गोष्टींची पुस्तके वाचून दाखवावीत. या वयात मुलांना सायकल चालविणे, मोटारगाडी खेळणे, तसेच बागेमध्ये फिरायला जाणे, बॅटबॉल खेळणे, बुद्धीला चालना देणारे पझल्स गेम खेळणे, तसेच बडबडगीते व बालगीते ऐकणे, एखादी गोष्ट ऐकणे या कला फार आवडतात व त्यामध्ये ती चांगलीच रमतात.

**५) सहा वर्षे ते दहा वर्षे :** या काळात मुलांना आयुष्य जगत असताना एक शिस्त लागावी, म्हणून वेगवेगळे प्रयोग करावेत. आतापर्यंत केलेल्या सर्व

### पंचेंद्रियांचा विकास


संस्कारांमधून मुलांची शारीरिक व मानसिक वाढ चांगल्या प्रकारे झालेली असते. त्यांची बुद्धिमत्ता देखील कुशाग्र झालेली असते. मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, म्हणून वेगवेगळ्या गोष्टींची इंग्लिश, मराठी व हिंदी पुस्तके आणून द्यावीत व त्यांचे वाचन करण्यास सांगावे. तसेच गणित या विषयाची आवड निर्माण व्हावी म्हणून व बुद्धीला चालना मिळावी म्हणून ॲबॅकस क्लास लावावा. यामध्ये बाळाचा कल कोठे आहे, हे पाहूनच विचार करावा. आपल्या मुलाला तबलावादन, गायन, नृत्य, बुद्धिबळ, एखादा मैदानी खेळ यामधील नेमकी कशात आवड आहे.

याचा विचार करून त्याचा व्यक्तिमत्त्वविकास करण्यासाठी वरीलपैकी एक किंवा दोन छंद जोपासावेत. मुलांचे पाठांतर चांगले व्हावे, म्हणून भगवद्गीतेचा बारावा व पंधरावा अध्याय वारंवार म्हणून घ्यावा. आध्यात्मिक आवड निर्माण व्हावी, म्हणून मनाचे श्लोक, रामरक्षा, पसायदान, गणपती स्तोत्र म्हणावयास सांगावे. घरातील वडीलधाऱ्यांना नमस्कार करणे, त्यांचा आदर करणे, आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करणे, रोज संध्याकाळी 'शुभं करोति...' म्हणणे या सवयी मुलांना लावाव्यात. मुलांना चांगल्या सवयी लागण्यासाठी त्यांच्यासोबत आई-वडिलांचा सहभाग असणे गरजेचे आहे. मुलांना केवळ सांगून उपयोग होत नाही, त्यासाठी स्वतः आईवडिलांनी देखील तसेच आचरण ठेवावे. मुलांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी व इंग्लिश भाषा सुधारण्यासाठी इंग्लिश वर्तमानपत्र वाचायला लावावे. टीव्हीवरील ॲनिमल प्लॅनेट, डिस्कव्हरी या चॅनलवरील कार्यक्रम मुलांना दाखवावेत. ओंकार गुंजन, योगासने, ध्यानधारणा यांची देखील मुलांना नियमित सवय लावावी.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

## वैदिक मॅथच्या संशोधनाबद्दल विकास कोतकर यांना पीएचडी



नगर – जिव्हाळा उद्योग समूह आणि स्मार्ट वैदिक मॅथचे संस्थापक विकास भारत कोतकर यांना भारत सरकारच्या नीती आयोग, मिनिस्ट्री ऑफ MHA, मिनिस्ट्री ऑफ कल्चर मंत्रालय, तसेच एशियन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी आणि विश्व मानवाधिकार संस्था यांच्या वतीने प्रमाणित वैदिक मॅथ या पद्धतीत एकच गणित अनेक वेगवेगळ्या पद्धतीने कसे सोडवावे या क्रांतिकारी संशोधनाबद्दल जगातील पहिली वैदिक मॅथ पीएचडी प्राप्त करण्याचा मान प्राप्त झाला आहे.

३० मे रोजी दिल्ली येथे GHRT India या ठिकाणी विकास भारत कोतकर यांना पीएचडी प्रदान केली जाणार आहे. त्यांच्या या संशोधनासाठी अहिल्यानगर शहराचे खासदार निलेश लंके यांनी त्यांचे कौतुक केले आहे. भारत आणि भारताबाहेर अनेक देशांमध्ये स्मार्ट वैदिक मॅथच्या शाखांद्वारे विकास कोतकर मार्गदर्शक म्हणून काम करीत आहेत.

# अहिल्यानगरकरांच्या मनात आजही ठाकरे, स्व. अनिलभैय्यांची शिवसेनाच

**किरण काळे यांचे प्रतिपादन; मनपा निवडणुकीपूर्वी संघटन मजबूतीसाठी संपर्क मोहिमेचे शिवसैनिकांना आवाहन**

नगर – अहिल्यानगरकरांनी सलग पंचवीस वर्ष शिवसेनेला निवडून दिल आहे. दोन वेळा शिवसेनेचा अत्यंत कमी फरकाने पराभव झाला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जागा वाटपात शहराची जागा जरी शिवसेनेला सुटली नसली तरी देखील महाविकास आघाडीला मिळालेली मते ही शिवसेनेचीच आहेत. अहिल्यानगरकरांच्या मनात आजही हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, हिंदू धर्मरक्षक स्व. अनिलभैय्या राठोड यांची शिवसेनाच आहे, असे प्रतिपादन ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने विभागवार बैठकांचे सत्र सुरू केले आहे. या अंतर्गत सावेडी उपनगर विभागातील प्रमुखांची पहिली बैठक पार पडली. यावेळी काळे बोलत होते. यावेळी शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. अंबादास शिंदे, रावजी नांगरे, कामगार सेनेचे विलास उबाळे, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रशांत भाले, सावेडी उपनगर उपशहर प्रमुख प्रशांत पाटील, कामगार सेना शहर प्रमुख गौरव ढोणे, अहिल्यानगर विधानसभा युवासेना युवा अधिकारी आनंद राठोड, केशव दरेकर, सुजय लांडे, ऋतुराज आमले, विजय सानप, तुषार लांडे, सुनील भोसले, अण्णा कोडम, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, आकाश अल्हाट, आनंद जवंजाळ, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे आदीं उपस्थित होते.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सावेडी विभागाची बैठक शहर प्रमुख किरण काळे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी विभागातील शिवसैनिक उपस्थित होते.

किरण काळे म्हणाले, मनपा निवडणुकीपूर्वी संघटन मजबूत करण्यासाठी शिवसैनिकांनी आपापल्या भागामध्ये संपर्क मोहिम राबवावी. ज्यांना शिवसेनेने मोठे केले ते जरी आज गद्दार सेनेत गेले असले तरी सामान्य शिवसैनिक, शिवसेनेचा मूळ मतदार आजही जागेवर आहे. मागील मनपा निवडणुकीत शिवसेना स्व. अनिल राठोड यांच्या नेतृत्वाखाली स्वबळावर लढली. स्वतंत्र लढून देखील शिवसेनेचे चोवीस नगरसेवक निवडून आले होते. बसपाचे चार नगरसेवक शिवसेनेच्या आशीर्वादाने निवडून आले होते. तर सहा ते आठ जागा या आपण केवळ चाळीस ते सव्वाशे मतांच्या अल्प फरकाने हरलो होतो. भाजपने ऐन वेळेला दगा दिल्यामुळे स्वबळावर लढण्याची भूमिका आपण घेतली होती. पूर्व तयारीने लढलो असतो तर त्याच वेळी एक हाती सत्ता येत मनपावर शिवसेनेचा स्वबळावर भगवा फडकला असता.

आजही अहिल्यानगरकरांना शिवसेनेकडून शहर विकासाची अपेक्षा आहे. त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपल्याला ताकदीने मनपा निवडणूक लढायची आहे. सावेडी उपनगरातील लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न, दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा. पिण्याचे पाणी, कचरा संकलन, पावसाळ्या पूर्वीची नालेसफाई, रस्त्यांची रखडलेली अर्धवट कामे आदी प्रश्नांवर आवाज उठवा. सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करा, असे आवाहन यावेळी बोलताना काळे यांनी शिवसैनिकांना केले.

### सामान्य शिवसैनिकाला संधी देण्याची मागणी

बैठकीत शिवसैनिकांनी संघटनात्मक बांधणी बाबत आपली मते मांडली. सामान्य शिवसैनिक गेल्या अनेक वर्षांपासून पक्षासाठी काम करतात. मात्र त्यांना पदे मिळाली नाहीत. प्रस्तावित शहर कार्यकारीणी मध्ये सामान्य शिवसैनिकाला संधी द्यावी, अशी एकमुखी मागणी यावेळी बैठकीत करण्यात आली. यावर उत्तर देताना किरण काळे म्हणाले, काहींनी खुर्च्या अडवून धरल्या होत्या. ज्यांना शिवसेनेने मोठे केले ते पळपुटे निघाले. सामान्य शिवसैनिकाला नेता करण्याची ताकद शिवसेनेत आहे. त्यामुळे प्रस्तावित कार्यकारीणी मध्ये जुन्या नव्यांचा मेळ घालत सामान्यातल्या सामान्य शिवसैनिकाला देखील पद देऊन काम करण्याची संधी दिली जाईल, असे काळे म्हणाले.



आनंदऋषिजी हॉस्पिटलमध्ये परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# ‘आनंदऋषिजी’मध्ये जागतिक परिचारीका दिन समर्पण

**सेवाभाव व कठोर परिश्रम करणाऱ्या परिचारीकांना सलाम करुन उत्साहात**

नगर – १२ मे हा जागतिक परिचारीका दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. परिचर्या सेवेच्या जनक फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. नगरमधील आनंदऋषिजी हॉस्पिटलमध्ये परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्त्रीरोग तज्ञ डॉ.हिरण चौधरी, वर्धमान महावीर युनिर्व्हसिटीचे संचालक सुनिल मालु, हॉस्पिटलचे वैद्यकिय अधिक्षक डॉ.वैभवी वंजारे, प्रशासकीय अधिकारी डॉ.आशिष भंडारी, नर्सिंग अधिक्षक श्रीमती स्मिता रुपवते, नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या स्वाती सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

यावेळी सर्वांनी आपल्या भाषणात नर्सेच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. हा दिवस रुग्णांची अहोरात्र सेवा करणाऱ्या परिचारीका बद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा हा दिवस असून परिचारीका आरोग्य क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावतात. त्यांच्या समर्पन सेवाभाव व कठोर परिश्रमांना सलाम आहे.

परिचारिका म्हणजे केवळ एक व्यवसाय नाही, तर ती एक सेवा आहे. रुग्णांच्या वेदनांमध्ये त्यांना आधार देणाऱ्या, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणाऱ्या या परिचारिका खऱ्या अर्थाने समाजाच्या आधारस्तंभ आहेत.

आमच्या नर्सेस... आमचं भविष्य... ज्यातुन नर्सिंग व्यवसायाच्या भविष्य काळातल्या भुमिकेवर प्रकाश टाकण्यात आला. नर्सिंग शिक्षिका प्रियंका वारे यांनी नर्सेस दिनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्या स्वाती सुर्यवंशी, शिक्षिका श्रद्धा वाघचौरे आणि उपप्राचार्या तेलघुणे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. स्वप्निल मिरपगार यांनी आभार मानले.

नर्सेससाठी वर्षभर घेतलेल्या विविध स्पर्धांचे यावेळी बक्षिस वितरण करण्यात आले. पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# रिपब्लिकन सेनेचे दक्षिण जिल्हाध्यक्षपदी अहिल्यानगरचे सुनील शिंदे यांची नियुक्ती



रिपब्लिकन सेनेचे दक्षिण जिल्हाध्यक्षपदी सुनील शिंदे यांची निवड करण्यात आल्याबद्दल सत्कार करतांना आनंदराज आंबेडकर.

नगर – रिपब्लिकन सेनेचे केंद्रीय कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, दादर पूर्व, मुंबई येथे रिपब्लिकन सेनेची राज्यस्तरीय आढावा बैठक झाली. या बैठकीस मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, कोकण प्रदेश व उत्तर महाराष्ट्र या विभागातून २९ जिल्हाध्यक्ष यांनी उपस्थिती दर्शवली. त्याचप्रमाणे या आढावा बैठकीत रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी सर्वांशी व्यक्तिगत चर्चा करून प्रत्येक जिल्ह्याचा संघटनात्मक आढावा घेतला. क्रियाशील कार्यकर्ता नोंदणीची माहिती घेउन पक्ष प्रवेश कार्यक्रम आदी उपक्रमाची माहिती घेऊन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मार्गदर्शनपर छोटेखानी सभा घेण्यात आली. यावेळी अहिल्यानगरचे सुनील शिंदे यांची या बैठकीत दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करुन आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते पत्र देन्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे सचिव विनोद काळे, विकास रणदिवे आदीसह सर्व महाराष्ट्रातील जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

नूतन दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी गेल्या २० वर्षापासून सामाजिक चळवळीत योगदान दिले व आंबेडकर यांच्या घराण्याशी एकनिष्ठ राहून आपले सामाजिक कार्य करत असल्याने या सामाजिक कार्याची दखल घेत निवड करण्यात आली.

शिंदे म्हणाले की, रिपब्लिकन सेनेचे कार्य हे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणार असून रिपब्लिकन सेना ही अहिल्यानगर जिल्ह्यात ठिकठिकाणी गाव तेथे शाखा उपक्रम राबवून संघटन मजबूत करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



निंबळक येथे संगीत रामकथा ज्ञानयज्ञात मार्गदर्शन करतांना ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे. तर दुसऱ्या छायाचित्रात भाविकभक्त.

# निंबळक येथे संगीतमय रामकथेचा समारोप

**सप्ताहाच्या पहिल्याच वर्षी हजारो भाविकांचा प्रतिसाद**

नगर – नगर तालुक्यातील निंबळक गावात पार पडलेल्या सात दिवसीय संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सप्ताह सोहळ्याचा समारोप भक्तीमय वातावरणात पार पडला. ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांच्या संगीतमय कीर्तनांनी आणि रामकथेच्या विविध प्रसंगांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. या सप्ताहात त्यांनी रामायणातील प्रसंग सादर करताना आई-वडिलांचे महत्त्व, बंधुप्रेम, आणि समाजातील दुर्बलांच्या मदतीचे मोल असे जीवनमूल्ये प्रभावी भाषेत व संगीताच्या माध्यमातून विशद केली. कीर्तनामध्ये त्यांनी शबरीची भक्ती, भरताचा त्याग आणि सीतेची शुद्धता असे हृदयस्पर्शी प्रसंग सादर करून विविध रामायणातील प्रसंगाने भाविकांना मंत्रमुग्ध केले.

हा धार्मिक सोहळा श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जन्मोत्सवा, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या ३६५ व्या वैकुंठगमन दिनानिमित्त आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन मराठा समन्वय परिषद महाराष्ट्र राज्याच्या कार्याध्यक्षा अनिता काळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके यांनी उपस्थित राहून सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी जि.प. सदस्य माधवराव लामखडे, सरपंच प्रियंका लामखडे, उद्योजक अजय लामखडे, आयोजक अनिता काळे उपस्थित होते. कार्यक्रमात महिला भाविकांचा सहभाग होता. रामाच्या अयोध्यागमनाच्या प्रसंगी महिलांनी आनंदात फुगड्यांचे फेर धरून उत्सवाला रंगत आणली.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अनिता काळे यांनी सांगितले की, रामकथेतून जीवनाला दिशा मिळत असते. या कथेतून बोध घेऊन अनेकांचे जीवन सफल झाले आहे. आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी या कथेचे आयोजन केले होते. या सप्ताहाचे हे पहिले वर्ष असून, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून हे दरवर्षी आयोजित केले जाईल. तसेच लवकरच महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सप्ताहातील सात दिवस संगीतमय रामकथेसह विविध धार्मिक कार्यक्रम, हरिपाठ, भजन, अभिषेक आणि महाआरती अशा अध्यात्मिक वातावरणाने गावात भक्तीचा महोत्सव अनुभवता आला. महाप्रसादाच्या वितरणाने सप्ताहाचा समारोप करण्यात आला.

या भक्तीमय सोहळ्यामुळे पंचक्रोशीत अध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली असून, पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात हा सोहळा साजरा केला जाईल, असा विश्वासही काळे यांनी व्यक्त केला.

# काकासाहेब म्हस्के विद्यालयाचे माजी विद्यार्थी २४ वर्षानंतर एकत्र

निंबळक – नगर तालुक्यातील नागपूर येथील काकासाहेब म्हस्के विद्यालयाच्या २००१ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा ११ मे रोजी नगर-मनमाड रोडवरील हॉटेल झाला. तब्बल दोन तपानंतर म्हणजे २४ वर्षानंतर सर्व वर्ग मित्र- मैत्रीणी एकत्र आले. जुन्या शालेय जीवनातील आठवणींशी पुन्हा एकरुप झाले. सुरुवातीस बॅचमधील दिवंगत व भारत -पाक मधील युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर प्रार्थना म्हणून कार्यक्रम सुरु झाला. उपस्थित गुरुजनांचा सन्मान शालेय व एक वृक्ष देऊन करण्यात आला. या प्रसंगी त्या बॅचला शिकविणारे मुख्याध्यापिका शितल बडे, मिरा बेल्हेकर, भोर मॅडम, अनिल कासार, शहाजान तांबोळी, संदीप बांगर, विनायक शिंदे हे शिक्षक उपस्थित होते. यांनी आपल्या मनोगतात शालेय आठवणींना उजाळा दिला.



काकासाहेब म्हस्के विद्यालयाच्या २००१ सालच्या १० वीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा झाला. (छाया – संदीप बांगर)

त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान शिक्षकांच्या हस्ते एक ट्रॉफी व फुल देऊन झाला. सर्व विद्यार्थ्यांनी मनोगतात आपले कुटुंब व आपण सध्या काय करत आहोत याची माहीती दिली, तसेच शाळा व शिक्षकांच्या काही आठवणी सांगीतल्या. काहींनी कवीता सादर केल्या. त्यानंतर सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला गेला. या प्रसंगी सतीश सावंत, राहूल उकीर्डे, अभिजीत तांबे, विवेक जाधव, अतुल लोटके, संदीप कातोरे, विजय अंत्रे, शशिकांत मोकाटे, दत्तात्रय शेजूळ, किशोर बामदळे, दिपक त्रिंबके, फिरोज शेख, अमोल व्यवहारे, धनंजय वाघ, शिवाजी अकोलकर, कपिल लिमन, एकनाथ डोंगरे, अरुण थिटे, शारदा निमसे, योगीता गाडेकर, उज्वला खिळे, सुषमा ताडगे, शितल बनकर, सीमा शिंदे, सोनाली शेळके, कविता चव्हाण, दिपाली धनवट, उज्वला जपे, वैशाली पुरनाळे, सीमा नेहुल, अनिता गुंजाळ, लक्ष्मी नागरगोजे, स्वाती इथापे, नंदा कातोरे, अर्चना कातोरे, शुभांगी ढगे, सुरेखा भगत, रिजवाना मुलानी, सुजाता थोरात, वैशाली बडे, आदि विद्यार्थी उपस्थित होते.

**स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा**

सूत्रसंचालन सोनाली शेळके, दिपाली धनवट यांनी केले.

संदीप कातोरे यांनी आभार मानले.

# अहमदनगर पहिली मंडळी काँग्रीगेशनल चर्चतर्फे ‘मायवार दिन’ उत्साहात साजरा

**माता-भगिनींचा सन्मान, ५० क्षयरोग रुग्णांना आहार वाटप – समाजसेवेचा प्रेरणादायी उपक्रम**

नगर – अहमदनगर पहिली मंडळी काँग्रीगेशनल चर्चच्या वतीने ‘मायवार दिन’ उत्साहात आणि सेवाभावी दृष्टिकोनातून साजरा करण्यात आला. या दिवशी चर्च प्रांगणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे माता-भगिनींचा सन्मान सोहळा आणि क्षयरोग ग्रस्त ५० रुग्णांना आहार किटचे वितरण. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना आणि गीतांनी झाली. त्यानंतर उपस्थित मातांना प्रेम, त्याग आणि संस्कारांचे प्रतीक मानून सन्मानित करण्यात आले. जेष्ठ सभासद शांताबाई जाधव यांचा प्रतिनिधी स्वरूपात सत्कार करण्यात आला. चर्चतर्फे देण्यात आलेल्या सन्मानचिन्हाने या सन्मान सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक आरोग्य जपणाऱ्या उपक्रमाचा एक भाग म्हणून ५० क्षयरोग रुग्णांना औषधोपचारासोबतच सकस आहार मिळावा यासाठी आहार किटचे वाटप करण्यात आले. हे वितरण चर्चचे अध्यक्ष रेव्ह. डॉ. सनी मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. या किटमध्ये रुग्णांसाठी आवश्यक असलेले पोषणयुक्त खाद्यपदार्थ समाविष्ट होते. यावेळी क्षयरोग नियंत्रण अधिकारी डॉ. अविनाश आहेर, शालिनी पवार, चर्च सेक्रेटरी रवींद्र ठोंबरे, डॉ. प्रशांत जायभाय, विलास भुजबळ, नितीन घोडके, माधव राठोड आदींची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या भाषणांद्वारे मातृत्वाचा गौरव करताना समाजसेवेसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास ख्रिस्ती समाजातील माता-भगिनींसह विविध वयोगटांतील लोक उपस्थित होते. मायवार दिन’ हा केवळ औपचारिक साजरा नव्हता, तर तो समाजातील महिलांचा सन्मान व आरोग्यविषयक जागरूकतेचा प्रेरणादायी प्रयत्न ठरला.



अहमदनगर पहिली मंडळी काँग्रीगेशनल चर्चतर्फे ‘मायवार दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला.

शालिनी पवार म्हणाल्या की, मातेने आपल्या मुलाचे जीवन घडविण्यासाठी खूप कष्ट करून मोठे केलेले असते आई-वडिलांचा मानसन्मान केला पाहिजे. तरच परमेश्वर आपल्याला आशीर्वाद देणार असून या माध्यमातून कुटुंबाचे देखील कल्याण होणार आहे. आई-वडिलांचा सन्मान करतो तेव्हा आपल्याला दीर्घायुष्य लाभते आणि आपले कल्याण होत असते. ह्यूम मेमोरियल चर्चमध्ये मोठ्या उस्ताद मायवार दिन साजरा झाला हा आनंद मला पाहायला मिळाला असे त्या म्हणाल्या.

क्षयरोग रुग्ण लवकर बरा होऊन समाजामध्ये वावरावा यासाठी चर्चा च्या माध्यमातून गहू, बाजरी, डाळ, तेल, अंडी, दूध पावडर असा सकस आहार क्षयरोग रुग्णांना दिला जातो समाजामध्ये आपण वावरत असताना समाजाचे आपले काहीतरी देणे लागते या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले कर्तव्य पार पाडले जात असल्याचे मत अध्यक्ष रेवरंट डॉ. सनी मिसाळ यांनी व्यक्त केले.

वर्षभरामध्ये सुमारे ५००० क्षयरोगरुग्ण आढळत असतात ते आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेले असतात चांगले आहारातून क्षयरोग रुग्ण लवकर बरा होत असतो, यासाठी अहमदनगर पहिली मंडळी चर्चने पुढाकार घेऊन समाजाप्रती चांगले काम उभे केले आहे, ही बाब कौतुकास्पद आहे याची दखल शासन नक्कीच घेईल क्षय मित्र योजना यशस्वीपणे राबवण्यास मदत होईल असे मत क्षयरोग तज्ञ डॉ. अविनाश आहेर यांनी व्यक्त केले. संपूर्ण जगात मायवार हा दिवस उत्साहात साजरा केला जातो. नगर शहरात ख्रिस्ती समाजाच्या वतीने मायवार दिन पहिली भक्ती ह्युम मेमोरियल चर्चमध्ये नारायण टिळक, शाहूराव मोडक, रावजी साठे यांच्या उपस्थितीत झाला. ख्रिस्ती बांधव आपल्या घरी उत्साहात मातेचा सन्मान करत असतात आई नसेल तर आपल्या मोठ्या बहिणींचा सन्मान केला जातो अशी माहिती चर्चचे सेक्रेटरी रवींद्र ठोंबरे यांनी दिली.

# उच्च पदावर राहून सुद्धा उर्दू साहित्याची सलीम यावर यांनी सेवा केली

**डॉ. कमर सुरूर**

नगर – आजच्या व्यस्त जीवनामध्ये व शासकीय नोकरीत उच्च पदावर असताना सुद्धा नगर येथील उर्दू शायर सलीम खान यावर यांनी उर्दू साहित्याची आपली आवड पूर्ण करून कवितासंग्रह लिहून ते प्रकाशित केले. व नियमित उर्दू साहित्याची सेवा करत राहिले असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव कवयत्री डॉ. कमर सुरुर यांनी केले.



मखदूम एज्युकेशन अँण्ड वेल्फेअर सोसायटी तर्फे नगर येथील कवी सलीम खान यावर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ताजियती नशिस्त मुशायराच्यावेळी प्रा. नवेद बिजापूरे.

मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी तर्फे नगर येथील कवी सलीम खान यावर यांच्या समृतिप्रित्यर्थ ताजियती नशिस्त मुशायराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. नवेद बिजापूरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, प्रा.डॉ. महबूब सय्यद, शरीफ खान, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, कलीम तांबटकर, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, कलीम शेख, डॉ. कमर सुरूर, निसार बागवान, तन्वीर चष्मावाला, राजुभाई शेख, जावेद मास्टर उपस्थित होते.

दिप प्रज्वलन युनुसभाई तांबटकर यांनी केले. शरीफ खान, सय्यद खालील व डॉ. कमर सुरुर यांनी सलीम खान यावर यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले.

मुशायरा मध्ये सलीम यावर यांच्यावर लिहिलेल्या कविता बिलाल अहदनगरी, सुलेमान अहमदनगरी, सय्यद खलील, डॉ.कमर सुरूर, आसिफ सर, नवेद बिजापूरे, शरीफ खान, हबीब पेंटर, मुन्नवर हुसैन यांनी सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राध्यापक नवेद बिजापुरे म्हणाले की भविष्यातील उर्दू साहित्यकांसाठी आजच्या साहित्यकांनी आपले साहित्य पुस्तक रूपात प्रसिद्ध केले पाहिजेत असे नमूद केले.

सूत्रसंचालन आबिद खान यांनी केले. निसार बागवान यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मखदूम सोसायटीच्या सर्व सदस्यांनी भरपूर परिश्रम घेतले.

# भारतातील शाळांमध्ये डॉ. कल्पना घडेकर यांचे अबॅकस संशोधन शिकवले जावे : अंजना पवार

नगर – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० देशांमध्ये लागू झाले असून यांमधून मोठी शैक्षणिक क्रांती घडणार आहे. यासाठी शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत. नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक संकल्पनांना आता महत्त्व येणार आहे. अशा परिस्थितीत पारंपारिक शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षणाच्या अबॅकस सारख्या संकल्पना आता महत्त्वाच्या ठरणार आहेत. भारतातील सर्व शाळांमध्ये डॉ.कल्पना घडेकर यांचे अबॅकस संशोधन शिकवले जावे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या उपाध्यक्षा अंजना पवार यांनी केले.



सौ. कल्पना घडेकर–कार्ले यांना अबॅकस संशोधनात पीएचडी मिळाली त्यानिमित्त त्यांचा सत्कार करताना अंजना पवार.

येथील रक्षिता महिला मंचच्या संस्थापिका सौ.कल्पना अशोक घडेकर– कार्ले यांना भारत सरकारच्या नीती आयोग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय तसेच सूक्ष्म व लघु उद्योग मंत्रालय, तसेच आयर्लंड क्रेडेशन फोरमच्या वतीने प्रमाणित लिजेंड्री पीस अवॉर्ड कौन्सिल या शैक्षणिक विद्यापीठाची अबॅकस या गणितीय संकल्पनेतील मोजणीमधील हातच्याची अडचण सोडवणाऱ्या क्रांतीकारी संशोधनाबद्दल केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील पहिली पीएचडी प्रदान करताना अंजना पवार बोलत होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बिहारचे खासदार सुरज मंडल, संगीतकार ब्रह्मपाल नागर, अभिनेत्री पायल सरकार उपस्थित होते.

शिष्यवृत्ती, राष्ट्रीय ओळखपत्र, पीएचडी सनद, गौरवचिन्ह, पीएचडी पदक, सॅश–सन्मान वस्त्र आदी या पदविकेचे स्वरूप असून नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे झालेल्या या समारंभात झालेल्या या सोहळ्यासाठी देश–विदेशातील शिक्षण तज्ञ उपस्थित होते. यावेळी डॉ. घडेकर यांनी पीएचडीच्या मुख्य विषयाचे अबॅकस मण्यांची पाटी, अबॅकस वरील स्वलिखित/ प्रकाशित वैशिष्ट्यपूर्ण ५० पुस्तकांचे प्रदर्शन, वैदिक गणिताची संकल्पना पीपीटी प्रेझेंटेशनसह सादरीकरण केले. सादरीकरणानंतर उपस्थित व विषय तज्ञ यांनी विचारलेल्या शंका व प्रश्नांचे निरसन केले.





शेवगावमध्ये देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून आखाड्यातील मातीचे पूजन करण्यात आले. शेजारील छायाचित्रात कुस्तीच्या पोस्टर्सचे अनावरण करताना आयोजक अरुण मुंढे आदी.

# देवा भाऊ केसरी कुस्ती स्पर्धेच्या तयारीला वेग

नगर – शेवगावमध्ये देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे यांनी शेवगावमध्ये पत्रकार परिषदेत दिली.

तत्पूर्वी सकाळी या स्पर्धेसाठी आखाड्यातील मातीचे पूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जगदीश धूत व विश्व हिंदू परिषदेचे ज्ञानेश्वर वंजारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, भाजपा प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस नंदू मुंढे, शिवसेनेचे एकनाथ कुसळकर, डॉ. नीरज लांडे, विलास फाटके, उदय मुंढे, कमलेश गांधी, अजय भारस्कर, कडू मगर, दिगू तात्या काथवटे, अंकुश अण्णा कुसळकर, अंकुश ढाकणे, पाथर्डी तालीम संघाचे अध्यक्ष पप्पू शिरसाट, डॉ. प्रदीप उगले, सचिन शिरसाठ, नितीन फुंदे, अॅड. श्याम कनगरे, भूषण देशमुख, सोमनाथ शिंदे, गणेश गर्जे, सागर जाधव, कानीफ साखरे इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना मुंढे यांनी सांगितले की, या स्पर्धेचे उद्घाटन २८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज, राम महाराज झिंजुर्के व प्रशांत (नाना) भालेराव यांच्या हस्ते होणार आहे. तसेच या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ २९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार असून, यावेळी जीम व कुस्ती संकुलचे देखील उद्घाटन होणार आहे.

या स्पर्धेचे खास आकर्षण म्हणजे प्रसिद्ध मल्लांची निमंत्रित थरारक कुस्ती राहणार आहेत. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध दिल्लीचा रुस्तुम हिंद अजय बनवाल यांच्यात दोन लाख रुपयांच्या बक्षीसावर रंगणारी कुस्ती ही प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्यात दीड लाख रुपयांची कुस्ती होणार असून, महिला विभागातही जबरदस्त झुंज पाहायला मिळणार आहे. नॅशनल मेडलिस्ट उषा कुमारी विरुद्ध नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती होणार असल्याची माहिती मुंढे यांनी दिली.

तब्बल ५ वर्षानंतर जिल्हा केसरी स्पर्धा होत असून, लहान ते मोठ्या एकूण ९ गटातील मल्लांचा समावेश राहणार आहे. जिल्ह्यातील मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा पर्वणी ठरणार असून, भरीव बक्षिसांचे नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील एक नंबरच्या विजेत्या मल्लास स्व. छबू पैलवान लांडगे यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा दिली जाणार असल्याची माहिती पै. वैभव लांडगे यांनी दिली.

# अहमदनगर महाविद्यालयाच्या एस.वाय.बीसीए विद्यार्थ्यांचे यश

नगर – पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या द्वितीय वर्ष बीसीए (सायन्स) विभागाच्या परीक्षेत अहमदनगर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.



पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या द्वितीय वर्ष बीसीए (सायन्स) विभागाच्या परीक्षेत अहमदनगर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. त्यांचा सन्मान करताना प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे समवेत प्रा. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रज्ज़ाक आदी.

या परीक्षेत प्रथम क्रमांक – सय्यद अलीजा फारुक (९०.९), द्वितीय क्रमांक – हराळ वैष्णवी दगडू (९०.०),तृतीय क्रमांक – शेख अनाम इरफान (८८.२) यांनी अनुक्रमे स्थान मिळवले आहे.

विद्यार्थ्यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य डॉ.नोएल पारगे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी सातत्य, शिस्त आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. हे यश फक्त गुणपत्रिकेवरच नाही, तर त्यांच्या आत्मविश्वासात आणि भविष्यातील वाटचालीतही महत्त्वाचे ठरेल. अशा विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावतो.

या प्रसंगी बीसीए विभागाचे मार्गदर्शक बी.पी. एच.ई सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबास यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सतत नवे काही शिकण्याची तयारी असणाऱ्या विद्यार्थ्यांना आज उत्तम संधी आहेत. हे विद्यार्थी त्याच दिशेने प्रगती करत असून त्यांनी केलेली ही सुरुवात प्रशंसनीय आहे. त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास प्रोफेसर दिलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रज्ज़ाक, विविध प्राध्यापक, उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपली यशोगाथा सांगताना शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे पाठबळ आणि स्वतःची मेहनत याचे श्रेय दिले.

महाविद्यालयाच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




मोतीलालजी फिरोदीया अखिल भारतीय खुली क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेच्या बक्षिस वितरण प्रसंगी विजेत्यांसमवेत नरेंद्र फिरोदिया. समवेत यशवंत बापट,सुबोध ठोंबरे, श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रवीण ठाकरे (जळगाव), शार्दुल टापसे (सांगली), पवन राठी (सोलापूर), शिशिर इंदुरकर (नागपूर), देवेंद्र ढोकळे, प्रशांत घंगेकर, किरण सरोदे, प्रकाश गुजराथी आदी.

# मोतीलालजी फिरोदीया अखिल भारतीय खुली क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेचा महाराष्ट्राचा वेदांत पानेसर विजेता तर गोव्याचा राहुल संगमा उपविजेता

नगर – ऑल इंडिया ओपन मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिक बुद्धिबळ स्पर्धा अहिल्यानगरच्या सप्तक सदन येथे झाली. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना आयोजित व शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित बुद्धिबळ स्पर्धेचा बक्षीस समारंभ झाला. ७ ते ११ मे या कालावधीत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे विजेत्यांना जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव), शार्दुल टापसे (सांगली), पवन राठी (सोलापूर), शिशिर इंदुरकर (नागपूर), देवेंद्र ढोकळे, प्रशांत घंगेकर, किरण सरोदे, प्रकाश गुजराथी, डॉ. स्मिता वाघ, अनुराधा बापट, शुभधा ठोंबरे, रोहिणी आडकर आदीसह खेळाडू पालक उपस्थित होते.

यावेळी नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, या स्पर्धेत जे सर्व विजेत्यांचे झाले आहेत त्यांचे अभिनंदन व जे पराभूत झाले आहेत त्यांनी दोन महिने चांगला सराव करून १८ जुलै रोजी होणाऱ्या बुद्धीबळ स्पर्धेत यशस्वी व्हावं असे आवाहन केले. अहिल्यानगर येथे खेळाडूं साठी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. ज्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात बुद्धिबळा खेळाची आवड निर्माण होऊन उत्कृष्ट बुद्धिबळ खेळाडू तयार होत आहेत व जिल्ह्याचे नाव मोठे करत आहेत. या स्पर्धेला महाराष्ट्र सह अनेक राज्यातील खेळाडू सहभागी होऊन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले या स्पर्धेत १७० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू सहभागी झाले होते. ही या स्पर्धेच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद बाबा असून त्यामुळे या स्पर्धेचा दर्जा उच्च स्तरावर पोहोचला आहे. जिल्ह्यातील अनेक बुद्धिबळ खेळाडू घडवण्यासाठी वेळोवेळी आम्ही नवनवीन उपक्रम राबवत असतो. बुद्धिबळ हा खेळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात ही लोकप्रिय झाला आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातुन या स्पर्धेत खेळाडू खेळण्यासाठी आले होते. मातृदिनाच्या शुभेच्छा त्यांनी सर्व सहभागी महिलांना दिल्या. व आपल्या मुलांसाठी सर्व माता जे कष्ट घेत आहे त्यांना वंदन केले.

या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे. खुला गट – प्रथम– वेदांत पानेसर, द्वितीय– राहुल संगमा, तृतीय– विरेश शरणार्थी, चतुर्थ– विक्रमादित्य कुलकर्णी, पाचवे– कृष्णा तेजा, सहावे–इंद्रजीत महिंद्रकर, सातवे– श्रीराज भोसले, आठवे– अर्णव कोळी, नववे– अरुण कटारिया, दहावे– शोनक बडोले, अकरावे– आदित्य बारटक्के, बारावे– अथर्व सोनी, तेरावे– चैतन्य गावकर, चौदावे– विराज राणे, पंधरावे– अपूर्व वाकचौरे.

बेस्ट रेटिग १७९९ ग्रुप: प्रथम– अपूर्व देशमुख, द्वितीय– आराध्य टिकम, तृतीय– उमेश आर्या, चतुर्थ– साहिल घोरगटे, पाचवे– भुवन शितोळे, सहावे– प्रसाद खेडकर, सातवे– मारुती कोंडागुरळे, आठवे– युधार्थ नरोडे, नववे– हित बलदवा, दहावे– संयम विश्वेश, अकरावे– हरदन शहा, बारावे– मोहनकर रुतम, तेरावे– चैतन्य पाटील, चौदावे– विंहग चांगन, पंधरावे–यश राणे.

बेस्ट रेटिंग १५९९ ग्रुप : प्रथम– आदर्श पाटील, द्वितीय– अनिश रावते, तृतीय– जीनम संकलेचा, चतुर्थ– सतीश म्हस्के, पाचवे– ऋषिकेश लोहणकर, सहावे– सार्थक शिंदे, सातवे– ओम वैद्य, आठवे– सुनील जोशी.

बेस्ट अनरेटेड : प्रथम– शौर्य भोंदवे, द्वितीय– राहुल ढवळे, तृतीय– स्वराज विश्वासे, चतुर्थ– देवांश तोतला, पाचवे– पार्श्व लिंगाडे, सहावे– प्रथमेश देवडेकर, सातवे– समर्थ भारस्कल, आठवे– श्रीहान करमकर.

बेस्ट ६० जेष्ठ खेळाडू : प्रथम– मिलिंद पारले, द्वितीय– दीपक ढेपे, तृतीय– ए.इ. सॅम्युअल, चतुर्थ– देवेंद्र चिंचाणी, पाचवे– सुरेंद्र सरदार, सहावे– ईश्वर रामटेके, सातवे– बलभीम कांबळे, आठवे– चंद्रकांत चौधरी.

उत्कृष्ट महिला : प्रथम– त्रिशा मारगज, द्वितीय– भूमिका वागळे, तृतीय– तन्मई घाटे, चतुर्थ– शर्वी बाकलीवाल, पाचवे– सई देव, सहावे– हिरणमयी कुलकर्णी, सातवे– दृश्य नाईक, आठवे– श्रावणी नानकर.

उत्कृष्ट अहिल्यानगर खेळाडू : प्रथम– आशिष चौधरी, द्वितीय– हर्ष घाडगे, तृतीय– आयुष वाघ, चतुर्थ– ऋषिकेश रानडे, पाचवे– स्वराज काळे, सहावे– दर्श पोरवाल, सातवे– श्रीराज इंगळे, आठवे– ईशान चोरडिया.

उत्कृष्ट अहिल्यानगर तालुका : प्रथम– वरद जोशी, द्वितीय– समृद्धी कोटे, तृतीय– विराज मचे, चतुर्थ– वेदांत शिंदे, पाचवे– अन्वय जोशी.

उत्कृष्ट ११ वर्षाखालील : प्रथम– रियांश द्विवेदी, द्वितीय– वरद पाटील, तृतीय– नैतिक माने, चतुर्थ– तीर्थ कोदरे, पाचवे– श्रेयस नलावडे, सहावे– मोहन झडे, सातवे– मानस करणसे, आठवे– आराध्या देसाई.

उत्कृष्ट ९ वर्षाखालील : प्रथम– आदेन लासरदो, द्वितीय– अनिश जवळकर, तृतीय– जयदेव महडा, चतुर्थ– पृथ्वा ठोंबरे, पाचवे– अंश पटेल, सहावे– शर्वी भंगुरकर, सातवे– अन्वित गायकवाड, आठवे– रीवा चारणकर.

उत्कृष्ट ७ वर्षाखाली : प्रथम– कविष भट्टाड, द्वितीय– शिवांश श्रीगादी, तृतीय– मुगांक पाटील.

# भगवान गौतम बुद्ध जयंती भिंगारमध्ये उत्साहात

## फुलांच्या वर्षावात बुध्द पुतळ्यास अभिवादन; धम्म विचारांवर मार्गदर्शन, स्वच्छता अभियान व मिठाई वाटप

नगर – जगाला करुणा, क्षमा आणि शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांची जयंती बुध्द पौर्णिमा भिंगारमधील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. पावसाच्या रिमझिम सरीतही, जॉगिंग पार्कमधील भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पवृष्टी करत उपस्थितांनी अभिवादन केले. या प्रसंगी जॉगिंग पार्कमध्ये स्वच्छता अभियानही राबविण्यात आले.



भगवान गौतम बुद्ध जयंती भिंगारमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व बुद्ध वंदनेने करण्यात आली. यानंतर धम्ममित्र संजय भिंगारदिवे व विकास भिंगारदिवे यांनी त्रिशरण आणि पंचशील घेतले. जयंतीनिमित्त मिठाई वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, दीपक धाडगे, रतन मेहेत्रे, दीपकराव घोडके, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रमेशराव वराडे, अभिजीत सपकाळ, सुधीर कपाळे, संजय भिंगारदिवे, सचिन चोपडा, विकास भिंगारदिवे, प्रकाश देवळालीकर, अनिल हळगावकर, शशिकांत पवार, राजू कांबळे, सरदारसिंग परदेशी, प्रांजली सपकाळ, सविता परदेशी, ईवान सपकाळ, संतोष लुणिया, सुहास देवराईकर, इंजी. नागेश खुरपे, मुन्ना वागस्कर, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, सिताराम परदेशी, नामदेवराव जावळे, योगेश चौधरी, प्रवीण परदेशी, हेमंत पंधारे, विशाल भामरे आदींसह अनेक सदस्य उपस्थित होते.

संजय सपकाळ यांनी म्हणाले की, भगवान बुद्धांनी मानवजातीसाठी करुणा, अहिंसा, क्षमा, शांती, त्याग, सेवा आणि समर्पण यांसारख्या नीतिसूत्रांची शिकवण दिली. धम्माच्या माध्यमातून त्यांनी आदर्श जीवनाचा मार्ग दाखविला असल्याचे सांगितले.

तसेच सचिन चोपडा, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, रमेश त्रिमुखे, रमेश वराडे, सुवर्णा महागडे–भिंगारदिवे, विकास भिंगारदिवे यांनी आपल्या मनोगतातून भगवान बुध्दांच्या विचारांची माहिती देत जीवनात धम्म स्वीकारण्याचे आवाहन केले. बुद्धांनी दिलेली पंचशील शिकवण हीच खऱ्या अर्थाने जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवते, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमातून धार्मिक, नैतिक व सामाजिक मूल्यांची प्रेरणा उपस्थितांना देण्यात आली.



भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे बुद्ध जयंतीनिमित्त भगवान बुध्दांच्या प्रतिमेला अभिवादन करताना बौद्धचार्य दीपक पाटोळे. समवेत गौतम पाचारणे, लक्ष्मण माघाडे, रवींद्र कांबळे, संतोष कांबळे, संजय डहाणे, रविकांत कांबळे, रतन तुपविहिरे, प्रकाश खंडागळे, सुमित डहाने, राम गायकवाड, बाबासाहेब डोळस, बाळू बनकर, मयूर गायकवाड, किरण उजागरे, करुणा गायकवाड, शोभा गाडे, माया उजागरे, मंदा भोसले, एकनाथ गायकवाड, सुमेध क्षीरसागर आदी.

# भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे बुद्ध जयंती साजरी

नगर – भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे भगवान बुद्ध यांची जयंती (पौर्णिमा) उत्सव साजरी करण्यात आली. सिद्धीबाग येथील बुद्ध विहार येथे शहर शाखेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर शहर अध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे सम वेत गौतम पाचारणे, लक्ष्मण माघाडे, रवींद्र कांबळे, संतोष कांबळे, संजय डहाणे, रविकांत कांबळे, रतन तुपविहिरे, प्रकाश खंडागळे, सुमित डहाने, राम गायकवाड, बाबासाहेब डोळस, बाळू बनकर, मयूर गायकवाड, किरण उजागरे, करुणा गायकवाड, शोभा गाडे, माया उजागरे, मंदा भोसले, एकनाथ गायकवाड, सुमेध क्षीरसागर, शिंदे मेजर आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी त्रिसरण बुद्ध पूजा पाठ करण्यात आली व भगवान बुद्धांच्या गुणाचे स्मरण करण्यात आले व बौद्धाचार्य दीपक पाटोळे यांनी भगवान बुद्ध यांचे जीवन चरित्र सागुन बुद्ध पूजा पाठ घेतली. दुपारी धम्मदेसनेचा कार्यक्रम झाला.

दीपक पाटोळे म्हणाले की, संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध महासभेच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



समर्थ प्रशालेत 'माझा गल्ला–माझी बचत' या उपक्रमाची सुरुवात करतांना विद्यार्थ्यांसमवेत डॉ. अमोल बागुल.

# विद्यार्थ्यांना प्रगतीपुस्तकाबरोबर शिक्षकाने वाटले गल्ले

### समर्थ प्रशालेत माझा गल्ला–माझी बचत उपक्रम

नगर – विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच आर्थिक बचतीची सवय लागून बँकिंग, गुंतवणूक आणि इतर वित्तीय बाबींची माहिती होऊन विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता समजावी म्हणून येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचे दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिके विजेते कलाकार डॉ.अमोल बागुल यांनी स्वखर्चातून शालेय निकालाच्या दिवशी प्रगती पुस्तकाबरोबर १०२ विद्यार्थ्यांना पैसे साठवण्यासाठी गल्ले वितरीत केले.

माझा गल्ला–माझी बचत या उपक्रमात १ मे– महाराष्ट्र दिन २०२५ ते १ मे २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांनी या गल्लयामध्ये पैसे साचवायचे असून आई.. मी पैसे वाचवणार, पप्पा.. मी पैसे साचवणार असे या उपक्रमाचे घोषवाक्य आहे. येत्या वर्षभरातील स्काऊट –गाईड– समाजसेवा यासारखे उपक्रमांतील स्व कमाई /खरी कमाई उपक्रमातील पैसे, वाढदिवशी मिळालेले पैसे, पाहुण्यांनी दिलेले खाऊचे पैसे, बक्षीसातून मिळालेले पैसे, एखाद्या शिष्यवृत्तीतून मिळालेले पैसे, घरातील रद्दी/भंगार विकून मिळालेले पैसे, प्रामाणिकपणे मिळालेले पैसे, महागड्या वस्तू टाळून बचत झालेले पैसे इत्यादी प्रकारची रक्कम या गल्लयामध्ये साठवायची आहे.

पालक व विद्यार्थी यांना संबोधित करताना डॉ.बागूल म्हणाले की विद्यार्थ्यांनी जुन्या रद्दी कागदापासून माझी बचत वही तयार करून त्यात स्वतःच्या जमाखर्चाचा साप्ताहिक तपशील लिहावा.शक्य असल्यास मोफत ऑनलाईन खर्च ट्रॅकर ॲपचा वापर करावा, माझी बचत हीच माझे भविष्य ओळखून वायफळ खर्च टाळावा, पालकांचे उत्पन्न व आपला खर्च यानुसार स्वतःचे बजेट तयार करावे. इच्छा व गरज याचा विचार करूनच स्वतःचा पॉकेटमनी खर्च करावा. कमीत कमी स्वतःच्या जन्मवर्षाइतके पैसे साचवावेत. एक वर्षांनंतर महाराष्ट्रदिनीच या उपक्रमातील बचतीचा आढावा घेतला जाणार आहे. पालकांनी उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. या उपक्रमासाठी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, तसेच शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, प्राचार्या संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# जाणीव फाऊंडेशन, नगरचा तुकाराम काळे व किशोर वाघ यांना गुणवंत कामगार पुरस्कार



गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान प्रसंगी कायनेटिक कंपनीचे वरिष्ठ मनुष्यबळ महाव्यवस्थापक शशिकांत गुळवे, गुणवंत कामगार किशोर वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी राजपाल शर्मा, गुणवंत कामगार तुकाराम काळे, ॲड. व इंजि कैलाश दिघे, ॲड. विक्रम वाडेकर व प्रदीप वाखुरे आदी.

नगर – आंतरराष्ट्रीय कामगार दिवस दरवर्षी १ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी, त्यांच्या संघर्षांचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांचे योगदान मान्य करण्यासाठी साजरा केला जातो. कामाचा सन्मान करा आणि कामगारांचा आदर करा हा या दिवसाचा मुख्य संदेश आहे.

कष्टकरी गुणवंत कामगारांचे कौतुक होणे आवश्यक आहे, हे विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून या वर्षी पासून जाणीव फाऊंडेशनच्या वतीने गुणवंत कामगार पुरस्कार देण्याचे नियोजन केले होते. यासाठी पात्र गुणवंत कामगारांना अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. परीक्षण करण्यासाठी संबंधित क्षेत्रातील ५ प्रतिष्ठितांची कमिटी नेमण्यात आली होती. नगर जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रातून आलेल्या २९ अर्जांमधून २ पात्र कामगारांची विशेष निकषांवर गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

पुरस्कार वितरण कार्यक्रम नुकताच नगरमध्ये कायनेटिक इंजिनीअरिंग या कंपनीच्या सभागृहामध्ये पार पडला. या कार्यक्रमात गुणवंत कामगार पुरस्कार तुकाराम काळे, कमिन्स कंपनी व किशोर वाघ, कायनेटिक कंपनी यांना प्रमुख पाहुणे मुख्य कार्यकारी अधिकारी राजपाल शर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विशेष म्हणजे सोबतच गुणवंत कामगारांच्या गृहलक्ष्मींचाही विशेष गौरव म्हणून त्यांच्यासाठीही मौल्यवान गृहोपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या.

अध्यक्षीय भाषणात राजपाल शर्मा यांनी जाणीव फाऊंडेशन गेल्या १० वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचं तोंड भरून कौतुक केले. आपण सगळे जण स्वतः साठी काम तर करतोच आहोत पण प्रत्येकाने समाजासाठीही काम करणे आवश्यक आहे, असेही ते पुढे म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहलगाम आतंकी हल्लयात शहीद पर्यटक व युद्धात शहिद झालेल्या वीर जवानांना जाणीव फाऊंडेशन व कायनेटिक कंपनीच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी कायनेटिकचे वरिष्ठ मनुष्यबळ महाव्यवस्थापक शशिकांत गुळवे, सुरेश जाधव, सुनील मुंडलीक, जाणीव फाऊंडेशनचे प्रदीप वाखुरे, राहुल जोशी, नोटरी पब्लिक व विश्वस्त जगदंबा देवी ट्रस्ट, मोहटादेवी व ॲड. विक्रम वाडेकर व इंजिनीयर कैलाश दिघे आदी उपस्थित होते. या कौतुक सोहळ्यासाठी कामगार व कर्मचारी उपस्थित होते. यासाठी कायनेटिक कंपनी कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# स्टेशन रोड, सोलापूर महामार्ग, कानडे मळा परिसराला जोडणाऱ्या रस्त्याचे काम २ महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश

### मनपा आयुक्त यशवंत डांगे



सोलापूर महामार्ग ते कानडे मळा रस्त्यासाठी व या मार्गाला जोडणाऱ्या हॉटेल फरहत ते भिंगारनाला या परिसरातील नागरिकांशी चर्चा करतांना आयुक्त यशवंत डांगे. समवेत परिसरातील नागरिक.

नगर – स्टेशन रोड व सोलापूर महामार्गाला जोडणाऱ्या, तसेच सोलापूर महामार्ग ते कानडे मळामार्गे सारसनगरला जोडणाऱ्या हॉटेल फरहत ते महावितरण ते भिंगार नाला रस्त्याच्या मार्गातील अडथळे दूर झाले आहेत. या रस्त्यात बाधित होणाऱ्या जागा मालकांशी, नागरिकांशी चर्चा करून मार्ग काढण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच या रस्त्याचे रखडलेले काम पूर्ण होऊन, रस्ता नागरिकांसाठी खुला होईल, असा विश्वास आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

सोलापूर महामार्ग ते कानडे मळा रस्त्यासाठी व या मार्गाला जोडणाऱ्या हॉटेल फरहत ते भिंगारनाला रस्त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. हॉटेल फरहतपासून भिंगार नाल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही ट्रस्ट व नागरिकांच्या जागा बाधित होत आहेत. काहींची अतिक्रमणे आहेत. त्यामुळे या रस्त्याचे काम रखडले होते. या संदर्भात तेथील जागा व अतिक्रमणधारकांशी चर्चा करून मार्ग काढण्यात आला आहे. तेथील नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्याची तयारी दर्शवली आहे. इतर ठिकाणी भूमिअभिलेख विभागाने रस्त्याची मोजणी करून देत जागा निश्चित करून दिली आहे. तेथील शेतकऱ्यांनीही या रस्त्याच्या कामासाठी सहकार्य केले आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामातील अडथळे दूर झाले असून, येत्या दोन महिन्यात काम पूर्ण करण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात आल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

दरम्यान, या रस्त्याचे काम झाल्यावर सोलापूर महामार्ग ते कानडे मळा रस्त्याला जोडणारा लिंक रस्ता तयार होणार आहे. कानडे मळा, सारसनगरकडे जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध वाहतूक या मार्गाने सुरू होणार आहे. तसेच, या रस्त्यामुळे स्टेशन रोड व सोलापूर महामार्ग जोडला जाणार असल्याचे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

# नगरमध्ये घरात लपवलेला गावठी कट्टा पकडला

### २ जिवंत काडतुसेही जप्त, जुनी कोर्ट गल्ली परिसरात कारवाई



नगर – काहीतरी गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना घरात लपवून ठेवलेला गावठी कट्टा कोतवाली पोलिसांनी पकडला आहे. ही कारवाई जामा मज्जिद समोर, जुनी कोर्टगल्ली येथे ११ मे रोजी केली. या कारवाईत एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतूस असा ४० हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना माहिती मिळाली की, जामा मज्जिद समोर, जुनी कोर्ट गल्ली येथे इसम नदिम गौसुउद्दीन शेख याने त्याचे राहते घरात गावठी कट्टा लपवून ठेवलेला आहे. अशी माहिती मिळाल्याने पो. नि. दराडे यांचे आदेशाने पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड पोलीस पथकासह त्याठिकाणी रवाना झाले. नदिम शेख याचे राहते घरासमोर उभे राहुन उपनिरीक्षक सेदवाड यांनी त्यांचे घराचा दरवाजा वाजविला.त्यावेळी घरातील एका महिलेने दरवाजा उघडला असता पोलीस पथकाने जिन्याने पहिल्या मजल्यावरील नदिम शेख याचे खोलीत जाऊन झडती घेतली असता खोलीतील कपाटामध्ये ४० हजार रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा त्यात एक स्टीलची मॅग्झीन, ४०० रुपये किंमतीचे दोन लहान आकाराचे जिवंत काडतूसे असा एकुण ४० हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने पोलीस उपनिरीक्षक सेदवाड यांनी जागीच जप्त केला आहे.

या प्रकरणी पो.कॉ.सतिष शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नदिम शेख याचेविरुध्द भारतीय शस्त्र अधिनियम १९४९ चे कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार संभाजी कोतकर, योगेश भिंगारदिवे, सलीम शेख, प्रतिभा नागरे, सतिष शिंदे, विजय गावडे, अतुल काजळे, महेश पवार, अमोल गाडे, तोहसीन शेख यांनी केली आहे.

# दुकानासमोर बसलेल्या व्यक्तीस बेदम मारहाण

### तिघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – दारु पिऊन दुकानासमोर बसलेल्या मद्यपीस येथे बसू नकोस असे म्हणून दुकानदाराने शिवीगाळ करुन अन्य दोघांच्या साहाय्याने लाथाबुक्क्यानी व लाकडी फळीने मारहाण केली. या मारहाणीत मद्यपी जखमी झाला. ही घटना माळीवाडा येथील दीपक वाईंसमोर ११ मे रोजी घडली.

या बाबत शिवराज अर्जुन बनसोडे (वय ४५, रा. संकल्प कॉलनी, बुऱ्हाणनगर, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हे सकाळी नऊ वाजताच्या सुमारास माळीवाडा येथील दीपक वाईन्स हॉटेल येथे दारु पिण्यासाठी गेले. दारु पिऊन घराकडे जाण्याकरिता निघाले असता दिपक वाईन्स दुकानासमोर असलेल्या बॅगेच्या दुकानासमोर बसले. त्यावेळी बॅग विक्री करणाऱ्या दुकानदारांनी फिर्यादीस त्या ठिकाणाहून उठण्यास सांगितले.

तेव्हा फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याने दुकानदाराने शिवीगाळ करुन फिर्यादीच्या हाताला धरुन काही अंतरावर असलेल्या चपलाच्या दुकानासमोर नेले. तेथे बॅग विक्री करणारे दुकानदार व इतर दोन अनोळखी इसमानी फिर्यादी यास मारहाण केली यावेळी बॅग विक्री करणाऱ्या दुकानदाराने खिळे मारलेल्या फळीने फिर्यादीस दोन्ही पायावर व डोक्यात जबर मारहाण केली.मारहाणीत फिर्यादी हे जखमी झाले. या झटापटीत फिर्यादी यांचा मोबाईल कोठेतरी पडून गहाळ झाला. जखमी फिर्यादीस त्याचे नातेवाईकांनी औषधोपचाराकरता खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात शिवराज बनसोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी तिघांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला अधिक तपास पोलीस हवालदार औटी हे करीत आहे.





महाराणा प्रताप जयंतीनिमित्त राजपूत समाज सेवा संस्थेचा उपक्रमशील उत्सव उत्सवात साजरा करताना राजपूत समाजाचे तरूण.

# महाराणा प्रताप यांच्या ४८५ व्या जयंतीनिमित्त राजपूत समाज सेवा संस्थेचा उपक्रमशील उत्सव

### मोटरसायकल रॅली, रक्तदान शिबिर आणि गुणवंतांचा गौरव

नगर – राजपूत समाज सेवा संस्था, अहिल्यानगर यांच्या वतीने महाराणा प्रताप यांची ४८५ वी जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने संस्थेने शहरात मोटरसायकल रॅली काढून महाराणा प्रताप यांच्या शौर्याचे स्मरण करत जनजागृती केली.

नगर–पुणे महामार्गावरील ओम गार्डन येथे पार पडलेल्या अभिवादन सोहळ्यात महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी महाराणांच्या शौर्य, स्वाभिमान आणि स्वातंत्र्यप्रियतेच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी नाशिक कारागृह अधीक्षक प्रकाश परदेशी, तोफखाना पोलीस ठाण्याचे स.पो.नि. उज्ज्वलसिंह राजपूत, स.पो. नि. पूनम श्रीवास्तव, स.पो.नि विनोदसिंह अरुणसिंह परदेशी, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य व उद्योजक रणजित विजयसिंह परदेशी आदी उपस्थित होते.

या जयंतीनिमित्त समाजात समाजाभिमुख योगदान देण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. सर्व रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचा विकास साधण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक आणि समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास लहानांपासून मोठ्यांपर्यंत समाजातील नागरिक उपस्थित राहिले.

# एसटी प्रवासादरम्यान महिलेच्या पर्समधून दागिन्यांची चोरी

नगर – एसटी बस ने माळीवाडा बसस्थानक ते वाळुंज प्रवासादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्समध्ये ठेवलेले चाळीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरुन नेले. ही घटना ११ मे रोजी सकाळी १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत मंडाबाई सर्जेराव नवले (वय ५५, रा. गुरव पिंपरी, ता. कर्जत) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या शेजारी राहणाऱ्या संगीता राजेंद्र गावडे यांच्यासह त्यांची मुलगी जया बोरुडे (रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) यांना भेटण्याकरिता गेल्या होत्या. तेथे तिला भेटून परत माळीवाडा बसस्थानक येथे एसटीने उतरल्या. माळीवाडा बसस्थानकावर प्रवाशांची जास्त गर्दी असल्याने त्यांनी मंगळसूत्र चोरीस जाऊ नये म्हणून संगीता गावडे यांच्याकडे देऊन तिच्याकडील बॅगमध्ये ठेवण्यास सांगितले. तेव्हा तिने फिर्यादी यांचे मंगळसूत्र तिच्याकडील बॅगमध्ये असलेल्या पर्समध्ये ठेवले.

त्यानंतर मिरजगाव येथे जाण्याकरिता पंढरपूर जाणाऱ्या बसमध्ये त्या बसल्या. प्रवासादरम्यान वाळुंज जवळ फिर्यादी यांनी संगीता गावडे हिस माझे सोन्याचे मंगळसूत्र व्यवस्थित ठेवले आहे का ते बघ असे म्हटले, त्यावर संगीता हिने बॅग उचकून पाहिले असता बॅगमध्ये ठेवलेली पर्स व त्यात ठेवलेले १५० मण्याचे दोन पळ्यात ओवलेले तीन पदरी सोन्याचे मंगळसूत्र दिसून आले नाही. त्यांनी बसमध्ये मंगळसूत्राचा शोध घेतला परंतु ते मिळून आली यावरुन गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने मंगळसूत्र चोरून नेले. अशी फिर्यादी यांची खात्री झाली. त्यानंतर मंडाबाई नवले यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली.या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असुन त्यापोटी आमच्या अशिलाकडुन विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १२/०५/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** -जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका नगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, मौजे वाळुंज येथील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**गट नं. ३७/३ चे एकुण क्षेत्रफळ ३ हे. ०२ आर याचा आकार ८ रु. ५५ पैसे**

**यांसी चतु:सीमा** - पूर्वेस : गट नं.३८
दक्षिणेस : गट नं.३३
पश्चिमेस : गट नं.३३२,
उत्तरेस : नगर–सोलापूर राष्ट्रीय महामार्ग (बायपास)

यापैकी सदर गटातील रस्त्यासाठी संपादीत झालेले ० हे. ४६ आर क्षेत्र वगळून उर्वरीत संपूर्ण क्षेत्र २ हे. ५६ आर याचा आकार ७ रु. २५ पैसे.

**यांसी चतु:सीमा** - पूर्वेस : गट नं.३८, दक्षिणेस : गट नं.३३
पश्चिमेस : गट नं. ३७ पैकी मल्लेशाम इगे व संजय म्याना यांची मिळकत,
उत्तरेस : नगर–सोलापूर राष्ट्रीय महामार्ग (बायपास)

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक -यापैकी ही संपुर्ण शेतजमिन मिळकत.**
**बाळासाहेब भागवत अडसुरे,**
रा. विळद रेल्वे गेट समोर, विळद, ता. जि. अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **निखिल अशोक कापसे रा. बेरड गल्ली, भिंगार, ता. जि. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा **साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ६४ मधील प्लॉट नं. १५ याचे एकुण क्षेत्रफळ ५३९.९६ चौ. मी. हे संपूर्ण क्षेत्र.**

**यांसी चतु:सिमा :-**
पुर्वेस : ९.२५ मी. रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. १६,
पश्चिमेस : प्लॉट नं. ५९, उत्तरेस : २५ मी. तपोवन रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर
दिनांक :– १२/०५/२०२५

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो नं. ९८६०६४६४६३,
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत या विद्यमान मालक **दिनेश दत्तु घोरपडे व आशाबाई दत्तु घोरपडे दोघे. रा. गांधीनगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही **साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास** ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :- डि ।। अहिल्यानगर सब डि ।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे बोल्हेगाव येथील सर्व्हे नं. ७५/३/४अ/४ब मधील प्लॉट नं. १८६ ते १९०/७ (७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं. ७५/३/४/४ब/ प्लॉट नं. १८६ ते १९०/७) याचे क्षेत्रफळ ५२.५० चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील रो हाऊस नं. ७ याचे आर सी सी स्ट्रक्चरमधील तळ मजल्याचे बांधकाम क्षेत्र २७.८५ चौ.मी. ही संपूर्ण मिळकत.

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :-**
पुर्वेस – प्लॉट नं. १९४, दक्षिणेस – प्लॉट नं. १८६ ते १९०/८,
पश्चिमेस – ६ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस – प्लॉट नं. १८६ ते १९०/६,

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर
दिनांक :– १२/०५/२०२५

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
मो नं. ९८६०६४६४६३,
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. निलेश सुभाष पांढरकर, रा.राघवेंद्र नगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर व श्री. विजय मोहनराव पठारे, रा.भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर** यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, सदर खरेदीपोटी आमच्या अशिलाने विसारापोटी रक्कम दिलेली आहे. विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजा विरहीत, तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच **७ दिवसांच्या आत** कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही कसल्याही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन** - डि अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालीका हद्दीतील मौजे **नालेगाव** येथील बिनशेती प्लॉट मिळकत खालील प्रमाणे –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
| --- | --- | --- |
| ४१/१/४३/१ | ४५ | २१७.०५ चौ.मी. |

हा संपूर्ण प्लॉट या प्लॉट मिळकतबाबत
यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–
पुर्वेस : ९.०० मीटर रस्ता पश्चिमेस : सर्व्हे नंबर ४३/१ पैकी क्षेत्र
दक्षिणेस : प्लॉट नंबर ४४ उत्तरेस : १२.०० मीटर डी.पी. रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमा पूर्वक बिनशेती प्लॉट मिळकत यामधील वहिवाटीच्या हक्कासह काही एक राखून न ठेविता असे.

अहिल्यानगर
दि.१२.०५.२०२५

**ॲड. सचिन सी. फुलसौंदर**
ऑफिस– तळ मजला, आनंद हाईट्स,
जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर.
मो. नं. ९९२२२२७१७८

